# हाकारा

HAKARA

वर्ष : एकविसावे • अंक चौथा

ऑक्टोबर - डिसेंबर २०००



## आदिवासी जीवन आणि संस्कृती

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

# रौप्य महोत्सवी वर्ष

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| **उपाध्यक्ष** | : | डॉ. विजय भानू |
| **मुख्य सचिव** | : | डॉ. सुधाकर मोराणकर |
| **सह सचिंव** | : | पुरुषोत्तम आगाशे |
| **खजिनदार** | : | जयवंत मंत्री |
| **सभासद** | : | ॲड. पद्‌माकर वळवी (आमदार) |
| | | डॉ. मिलिंद बोकील |
| | | सुधीर जोग |
| | | गणपत पंडित |
| | | आरती कौलगेकर |
| | | सुमेध गुर्जर |

---

*दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती, इतर अकिंचन कष्टकरी वर्ग आणि स्त्रिया यांच्या शोषणमुक्तीसाठी जर कुठे लोकशाहीच्या तत्त्वावर चळवळ संघटित होत असेल तर तिला पाठिंबा देणे, तिच्याशी आपल्या विचारांचा अनुबंध राखणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रबोधनाची हीच खरी योग्य दिशा आहे, असे मला वाटते.*

**गं. बा. सरदार**

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

# हाकारा (त्रैमासिक)



वर्ष : एकविसावे • ऑक्टोबर-डिसेंबर २००० • अंक : चौथा

**संकल्पना व प्रेरणा**
कै. ग. बा. सरदार

**संपादक - मुद्रक - प्रकाशक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
ग. शां. पंडित

**संपादक मंडळ**
मिलिंद बोकील
सुधीर जोग
श्रीनिवास इंदापूरकर
पुरुषोत्तम आगाशे

**अक्षर जुळणी**
ओजसी एंटरप्रायजेस, पुणे
फोन नं. ४२५१५७०

**मुद्रण स्थळ**
ज्ञानप्रबोधिनी मुद्रण विभाग, पुणे - ३०

**मुखपृष्ठ छायाचित्र**
परिषदेच्या संग्रहातून

**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७
फोन/फॅक्स : (०२०) ५८८७२१९

*अंकाचे मूल्य : रुपये २५/-*

## अनुक्रम

संपादकीय

**महाराष्ट्र - समाज व संस्कृती : मानवशास्त्रीय दृष्टिकोन**
डॉ. नरेंद्र बोखारे ०३

**जव्हार-मोखाडा तालुक्यातील आदिवासी समाज**
प्रा. कामिनी पटेल १९

**आदिवासींची सत्तासूक्ते**
डॉ. गोविंद गारे २४

**कैफियत आदिवासी माणसाची**
सौ. कुसुम अलाम २९

**आदिवासींच्या शिक्षणातील मुख्य समस्या**
प्रा. अरविंद सी. राणे ३१

**बारागाव डांगची थोडक्यात माहिती**
रतन पवार ३५

**आधी केलेचि पाहिजे**
भारती मेहता ३७

**दिसतं तसं नसतं**
प्रा. बी. जे . राहसे ३८

**आदिवासी क्रांतीकारक 'खाज्या नाईक व भीमा नाईक'**
वीरसिंग पाडवी ४१

**पुस्तक परिचय**
सुनील कुमरे ४४

**संस्थावृत्त** ४७

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अंशत: अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

'हाकारा' च्या विशेषांकाच्या परंपरेपासून थोडासा वेगळा हा अंक असला तरी विशेषांकाच्या जवळ जाणाराच आहे.

डॉ. नरेंद्र बोखारे यांनी आपल्या प्रदीर्घ लेखाने या अंकाला विशेषांकाचे स्वरूप आणले आहे. आदिवासी संस्कृतीचा शोध घेता - घेता त्यांनी महाराष्ट्राच्या मूळ संस्कृतीबद्दल, समाजाबद्दल, प्रदेशाबद्दल मानवशास्त्रीय दृष्टिकोनातून एक प्रकाशझोत टाकला आहे. यातून त्यांनी मराठी समाज-मनाचे विश्लेषण व मराठी संस्कृतीची सांगोपांग चर्चा केली आहे. तसेच महाराष्ट्रात मूळ संस्कृती कोणती होती व पुढे तिच्यात कोणत्या कारणांनी काय बदल होत गेले, याची विस्तृत माहिती दिली आहे.

डॉ. गोविंद गारे यांचा 'सत्तासूक्ते' विषयावरील लेख चिंतनशील आहे. तर 'आदिवासी माणसाची कैफियत' सांगताना आदिवासी स्त्रीची नक्षलवाद्यांकडून होणारा छळ, आदिवासींच्या भोळेपणाचा घेतला जाणारा गैरफायदा इत्यादी विषयांचे विवेचन कुसुम अलाम यांनी केले आहे.

जव्हार-मोखाड्यातील आदिवासी जीवन-संस्कृतीची, राहणीमानाची, आहार व चालीरीतींची लेखिकेने करून दिलेली ओळख माहितीप्रद आहे. प्रा. अरविंद राणे यांनी 'आदिवासींच्या शिक्षणात प्रामुख्याने कोणत्या समस्या आहेत' व त्यासाठी काय करणे आवश्यक आहे ते थोडक्यात सांगितले आहे; तर प्रा. राहसे यांनी आदिवासींमध्ये विकास घडवून आणण्यासाठी त्यांनी स्वत:च प्रयत्न करणे कसे गरजेचे आहे व त्यासाठी संघटीत प्रयत्नांची गरज असल्याचे प्रतिपादन केले आहे.

'बारागाव डांग' च्या हकीगती सांगताना लेखकाने स्वातंत्र्यानंतरही या बारा गावांमध्ये फारसा फरक पडलेला नाही व त्यातल्या कोणत्या गोष्टी अजूनही कशा चालू आहेत हे दाखवून दिले आहे.

'रान पाखरांची माय' काव्यसंग्रहाचे परीक्षण करताना सुनिल कुमरे यांनी वस्तुस्थितीचे भान आणून दिले आहे. भुजंग मेश्रामांच्या अनुवादित कविता सुद्धा मार्मिकतेचा अनुभव देऊन जातात.

अंकाबद्दलच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास इच्छुक आहोत.

- संपादक मंडळ

# महाराष्ट्र - समाज व संस्कृती : मानवशास्त्रीय दृष्टिकोन

- डॉ. नरेंद्र बोरखारे

## संस्कृती - मानवशास्त्रीय दृष्टिकोन

एखाद्या समाजाच्या अथवा राष्ट्राच्या संस्कृतीचा अभ्यास करताना प्रथम संस्कृती म्हणजे काय या गोष्टीचा सांगोपांग विचार आवश्यक आहे. संस्कृती या संज्ञेबद्दल सांस्कृतिक मानवशास्त्रात बरेच सैद्धांतिक संशोधन झालेले आहे. म्हणून आजच्या विषयासाठी वैचारिक बैठक म्हणून सांस्कृतिक मानवशास्त्रातील मूलभूत संकल्पनांचा आधार उपयोगी ठरावा. मानवशास्त्रीय दृष्टिकोनानुसार एखाद्या समाजाचा अभ्यास करताना त्या समाजातील लोकसमूहात दिसणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि शारीरिक वैशिष्ट्यांचा व विविधतेचा परामर्श घेणे आवश्यक ठरते. ही वैशिष्ट्ये व विविधतेचे घटक परस्परानुरूप व कधी कधी परस्परावलंबी असतात. त्यामुळे मानवशास्त्राच्या पद्धतीनुसार सर्व घटकांचा एकत्रित अभ्यास करून त्यावरुन निष्कर्ष काढणे वस्तुनिष्ठ (Objecvtive) दृष्टिकोनाचे व सर्वसमावेश (Holistic) पद्धतीचे द्योतक ठरते. यादृष्टीने मानवशास्त्र विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

मानवशास्त्रातील सांस्कृतिक मानवशास्त्र (Cultural Anthropology) या उपशाखेमध्ये संस्कृती (Culture) या संज्ञेच्या अनेक व्याख्या दिलेल्या आहेत. त्या सर्वांचा गोषवारा काढला असता ''संस्कारपूर्ण, संस्कारमय जीवन जगण्याची देशकाळ - विशिष्ट पद्धती म्हणजे संस्कृती'' असा अर्थ ढोबळ मानाने निघतो. तरीसुद्धा संस्कार या शब्दाचा अर्थ उलगडून पाहणे आवश्यक आहे.

पृथ्वीवरील सर्व वस्तू एकमेकांवर क्रिया-प्रतिक्रिया करीत असतात. पावसाने दगड झिजतो, माती भिजते, बीज अंकुरते, उन्हाने दगड फुटतो, झाडे वाळतात, नदीच्या प्रवाहाने खडकांपासून वाळू बनते, जमिनीवर उंचसखल भाग तयार होतात. हे संस्कार त्या पदार्थांच्या स्वत:च्या इच्छेनुसार नव्हे तर निसर्गाच्या नियमानुसार होत असतात. घरे, शेती, धरणे हे जमिनीवर घडवलेले संस्कार मानवाच्या संस्कारित कृतींची प्रमाणे आहेत. जड वस्तूंना स्वत:चे संस्कारमय जीवन नसते. प्राणी, पक्षी, कीटक पिलांना जन्म देतात. त्यांचे संगोपन करतात. त्यांच्यापैकी काहीजण घरटी बांधतात. काही जणात कळप व संघभावना असते. उच्च-नीच भाव असतो. मालकी हक्काची जाणीव असते. कळपांचे म्होरके व अनुयायी असतात. थोडक्यात म्हणजे विशिष्ट जीवनपद्धती या अर्थाने पाहिल्यास त्यांची स्वत:ची अशी एक संस्कृती असते.

परंतु मानवी संस्कृती व इतर जीवसृष्टीमधली संस्कृती यांच्या निर्मितीत फार मोठा फरक आहे. हजारो पिढ्यांपूर्वीचे प्राणी, पक्षी, कीटक जो जीवनक्रम जगत आले आहेत तोच अद्यापिही जगत आहेत. चिमण्या, सुगरण पक्षी परत परत तसेच घरटे

बांधतात. कोकीळा दरवर्षी कावळ्याच्या घरट्यात अंडी घालते. मांजर आपल्या पिलांना त्याचप्रमाणे भक्ष्य पकडणे शिकवते, मधमाशा षटकोनी घरेच बांधतात. दर पिढी आपल्या पिलांना तेच शिकवते. पिढ्यान्‌पिढ्यांचा जीवनक्रम एकाच चाकोरीतून जातो. एक पिढी दुसऱ्या पिढीस नवीन शिकवित नाही. यात बदल झालाच तर अतिशय हळू व अतिशय थोड्या प्रमाणावर होतो. त्यात नवनिर्मिती नाही, ज्ञानाचा संचय नाही व त्या ज्ञानसंचयाचे खालच्या पिढीकडे संक्रमणही होत नाही.

माणसांचे तसे नाही. मानवी जीवनात जी नवनिर्मिती होत असते ती माणसे स्वत: हेतूपूर्वक करतात. तिचा सांभाळ करतात व ती नव्या पिढीपर्यंत पोचवतात. आपण ज्याला आपला सांस्कृतिक वारसा, ठेवा, संचित म्हणतो, त्यामागे आपण ते मागील पिढ्यांकडून परंपरेने स्वीकारल्याचा भाव व जाणीव व्यक्त करीत असतो. संस्कृती ही समाजाची निर्मिती आहे. एकट्या व्यक्तींकडून संस्कृतीची निर्मिती होणे अशक्य आहे. पण प्रत्येक व्यक्ती आपली सर्व भौतिक व मानसिक संपत्ती मागे ठेवून जाते व ती पुढच्या पिढ्यांना उपयोगी पडते. हे संक्रमण हेच संस्कृतीचे मुख्य बीज आहे. मानवी संस्कृतीची उत्पत्ती, संवर्धन व संक्रमण भाषेच्याद्वारे होते (कर्वे : १९६४)

संस्कृतीचे एक अंग दृश्य असते. त्यात घरे, कपडेलत्ते, खाण्यापिण्याचे पदार्थ, हत्यारे, अवजारे, यंत्रे, मनोरंजनाची साधने इत्यादी सर्व इंद्रियगम्य वस्तू येतात. त्यांना भौतिक संस्कृती (material culture) म्हणतात. संस्कृतीचे दुसरे अंग मानसिक व बुद्धीगम्य आहे - ते म्हणजे मनुष्याने घालून दिलेले सामाजिक जीवन जगण्याचे रीतीरिवाज. प्रत्येक समाजात एकमेकांशी कसे वागावे, कुटुंब, जात, राष्ट्र म्हणून संघटीत जीवन कसे जगावे याचे ठराविक नियम असतात. तसेच धर्म, नीतीमत्ता याबद्दल साचेबद्ध कल्पना असतात. या नियमांना व कल्पनांना घट्ट बांधून त्याचा समाजधारणेसाठी उपयोग व्हावा म्हणून कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, राज्यसंस्था, धर्मसंस्था आदी विविध समाजसंस्था निर्माण होत असतात व त्यामधूनच संस्कृतीच्या वाङ्‌मय साहित्य, कला इत्यादी अंगोपांगाची निर्मिती होत असते.

घरेदारे बांधून स्थायिक झालेल्या मानवसमूहांनी शेती व निरनिराळे व्यवसाय करुन स्वसंरक्षणासाठी नवनवीन शस्त्रे व वस्त्रे निर्माण करुन, त्यात समाजघटकांमधील परस्परसंबंध नियंत्रित केले आहेत. असे नियमबाह्य सामाजिक जीवन जगण्यासाठी अंगिकारलेली पद्धती म्हणजे संस्कृतीची सुरुवात आणि त्या त्या समाजाची धार्मिक, नैतिक, आध्यात्मिक, शैक्षणिक विचारसंपदा व वाङ् मय, वैवाहिक, कौटुंबिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक संस्था; मानसशास्त्रीय, बौद्धिक, भावनिक व व्यावहारीक जीवनप्रणालींचा अभिजात संगीत, नृत्य, नाट्य, काव्य या ललित कला आणि शिल्प चित्र, साहित्य व सौंदर्यविषयक कल्पना यामधून झालेला अविष्कार म्हणजे त्या संस्कृतीचे संचित.

थोडक्यात म्हणजे एखाद्या समाजाच्या संस्कृतीचा अभ्यास करताना त्या समाजातील भवन (घरेदारे), भजन (धार्मिक आचारविचार), भाषा,

भावना, भूषा (कपडे, प्रसाधन) व भोजन (खाद्यजीवन) यांच्याशी निगडीत असलेल्या रुढी, परंपरा, चालीरिती, त्याचबरोबर त्या समाजातील कुटुंबरचना, कुटुंबपद्धती, सामाजिक उतरंड, राज्यपद्धती, न्यायपद्धती, अर्थव्यवस्था, तत्त्वज्ञान, वाङ्मय, कला, कौशल्ये व स्वभाववैशिष्ट्ये लक्षात घेणे आवश्यक आहे.

कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचा वारसा मागील पिढीकडून पुढील पिढीस मिळत राहतो. यामागे शिक्षणाची प्रक्रिया अध्याहृत आहे. पण मानवी संस्कृती प्रवाही असल्याने नकळत थोडीथोडी बदलत राहते. हे बदल युद्धांमध्ये जित्यांची संस्कृती जेत्यांवर लादली जाऊन, तसेच दळणवळणातील सुधारणेमुळे भिन्न समाजजीवनात बदल होऊन होत असतात. संस्कृती देशकाल - परिस्थितीनुरुप तयार होत असते. तशीच ती देश काल, परिस्थिती सापेक्षही असते.

संस्कृती माणसाचे जीवन घडवते. ती व्यक्तींच्या आयुष्याची दिशा निश्चित करते तर व्यक्ती देशकालाला अनुसरुन संस्कृतीचा प्रवाह हळूहळू व नकळत बदलीत असते. संस्कृती माणसाचे अंतर्बाह्य जीवन व्यापून राहते. भौतिक साधनसामुग्रीची विविधता व विपुलता हे समृद्ध संस्कृतीचे केवळ बाह्यरुप आहे. संस्कृतीचा गाभा व अंत:स्वरुप म्हणजे सामाजिक जीवनाला पोषक असा गुणसमुच्चय, माणसांमधील सत्प्रवृत्तीची वाढ करणे, त्याची ज्ञानधारणा वाढवणे, त्याला समाजाभिमुख बनविणे व मनुष्यातील पाशवी वृत्तींचा नाश करीत त्याला उच्च पातळीवर पोचविणे हे संस्कृतीचे मुख्य कार्य आहे. समाज व संस्कृती यात समन्वयसंबंध असून दोन्ही परस्पराश्रयी आहेत.

मानवी शरीरावर व मनावर संस्कार घडविण्यासाठी निर्माण केलेले संकेत व त्यांचा अविष्कार करणारे आचार यांचा अंतर्भाव संस्कृतीत होतो. विचारपूर्वक संस्कार दिले गेलेले आचार विचारच संस्कृतीत अंतर्भूत होऊ शकतात. कारण संस्कृती या संकल्पनेचे मूळ रुप प्रकृती असे आहे. नैसर्गिक प्रकृतीवर आचारविचारांचे योग्य संस्कार झाले तरत्यामधून संस्कृती निर्माण होते; परंतु अयोग्य संस्कार झाले तर त्यातून विकृती निर्माण होते. म्हणूनच व्यक्तीगत आचाराविचारांतून राष्ट्रीय संस्कृतीची प्रगल्भता कळून येते. राष्ट्रीय भावना, राष्ट्रीय ध्येय व ती साधतील अशा धोरणाने केलेली आचारांची व्यवस्था यांनी राष्ट्रीय संस्कृती बनते.

म्हणून महाराष्ट्र संस्कृती व समाजाचे मानवशास्त्रीय परीक्षण करताना महाराष्ट्रातील लोकांच्या प्राचीन व अर्वाचीन काळातील आचार विचारांचा परामर्श घेणे आवश्यक ठरते. त्यामुळे आपण महाराष्ट्रातील लोक म्हणून आज जे काही आहोत ते का आहोत व आपण ज्या पद्धतीने वागतो ते का वागतो या प्रश्नांचा उलगडा होण्यास मदत होईल. त्यासाठी हा महाराष्ट्रीय समाज कोठून आलाय,या मूळ प्रश्नांपासून सुरुवात करणे संयुक्तिक ठरेल.

## महाराष्ट्र प्रदेश

लक्षावधी वर्षांपूर्वी झालेल्या ज्वालामुखीच्या उद्रेकाने वाहात आलेल्या शिलारसापासून बनलेल्या

काळ्या कातळापासून महाराष्ट्राची भौगोलिक रचना झालेली आहे. हा उंचवट्याचा प्रदेश असल्याने याला दख्खनचे (दक्षिणेकडचे) पठार असेही म्हणतात. महाराष्ट्राच्या सध्याच्या सीमारेषा म्हणजे पूर्वेस नागपूर चंद्रपूर पासून पश्चिमेस अरबी समुद्राला लागून गुजरातच्या दक्षिण सरहद्दीपर्यंत, तेथून समुद्रकिनाऱ्याने दक्षिणेस गोव्यापर्यंत अशा आहेत. या सीमारेषांमधील व गोवा ते नागपूर चंद्रपूर या भागांना जोडणारी रेषा या मर्यादेतील त्रिकोणीकृती प्रदेश म्हणजे सध्याचा महाराष्ट्र प्रदेश. या प्रदेशात कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खानदेश व मराठवाडा हे विभाग समाविष्ट होतात.

महाराष्ट्राची प्रादेशिक ओळख निदान महाभारत काळापासून (इ.स. १००० ते इ.स. पूर्व १२०० वर्ष) तरी आहे (कर्वे : १९६७). महाभारतात जी देशांची माहिती दिली आहे त्यात विदर्भ, अश्मक, अपरान्त-कोकण या देशांचा उल्लेख गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र इत्यादी देशांच्या बरोबरीने केला आहे. महाभारताच्या वनपर्वात प्राचीन दक्षिणापथाचा - दक्षिणेकडील मार्गाचा - व त्यापुढील विदर्भाचा उल्लेख आहे. पण त्याआधी म्हणजे ऋग्वेद काळातही विंध्यपर्वताच्या दक्षिणेकडील भागाचा दक्षिणापथ असा उल्लेख आढळतो. रामायणकाळातील दंडकारण्याचा उल्लेख महाराष्ट्राला अनुषंगून आहे हे सुपरिचित आहे. कौटिलीय अर्थशास्त्रात अश्मक व अपरान्त या देशांमधील पावसाच्या प्रमाणाचा उल्लेख आढळतो. इतर अनेक ठिकाणीही अश्मक, विदर्भ कुंतल (कृष्णाकाठचा प्रदेश) शूर्पार, नासिक्य, कुंकण इत्यादी प्रदेशांचा निर्देश आहे. या सर्व लहान राष्ट्रांचा अंतर्भाव करुन झालेल्या मोठ्या राष्ट्राला 'महाराष्ट्र' हे नाव इसवीसनापूर्वीच ३०० ते ४०० वर्षे पडले होते असे बरेच पुरावे मिळतात. सम्राट अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी भारताच्या विविध भागात जे धर्मप्रसारक पाठवले होते, त्यापैकी दोघेजण अपरान्त (कोकण) व महाराष्ट्र देशात पाठवले होते, असा उल्लेख आहे. तसेच अशोकाच्या शिलालेखांमधून राष्ट्रीक पेतनीक, अपरान्त अशा महाराष्ट्रातील विविध भूभागांची नावे आलेली आहेत. या भूभागात बोलल्या जाणाऱ्या भाषेलाच 'महाराष्ट्री' असे नाव दिले गेले. पेंडसे (१९६५) यांच्या विवेचनानुसार या प्रदेशात 'रट्ट' किंवा राष्ट्रीक नावाचे क्षत्रिय राहात होते. पुढे आपणास महारट्ट अथवा महाराष्ट्रीय म्हणवून घेऊ लागले. त्यामुळे त्यांच्या प्रदेशास महाराष्ट्र हे नाव पडले असावे. इथे राष्ट्र हा शब्द देशवाचक नसून समाजवाचक आहे आणि पुढे 'महारट्ट' चे संस्कृतीकरण होऊन 'महाराष्ट्र' असे रुप झाले असावे असा तर्क आहे. पुराणकाळामध्ये रचल्या गेलेल्या वायुपुराण, मत्स्यपुराण व मार्कण्डेय पुराणांमध्ये (अंदाजे इ.स.पू. ३००) इतर जानपदांबरोबर महाराष्ट्राचा उल्लेख आहे.

ऐतिहासिक काळात महाराष्ट्रावर मौर्य सम्राटांनी (इ.स.पू. ३२१ ते इ.स.पू. १८४) राज्य केले. त्यानंतर इ.स. २०० पर्यंत आंध्रभृत्य सातवाहन राजांनी, त्यानंतर त्रैकूटक, त्यांच्यानंतर वाकाटक व नंतर कलचूरी राजांनी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांमधून राज्य केले. ऐहोळे येथील शिलालेखात (इ.स. ६३४) सत्याश्रय पुलकेशी या चालुक्य राजाने ९९,००० खेडी असलेल्या आश्मक, कुंतल व अपरान्त या तिन्ही महाराष्ट्रावर स्वामित्व मिळवल्याचा उल्लेख

आहे. ''गाथासप्तशती'' हा महाराष्ट्र प्राकृत भाषेतील गाथासंग्रह संपादित करणारा राजा व कवी हाल हा सातवाहन राजा पहिल्या शतकात महाराष्ट्रावर गोदावरी काठी राज्य करीत होता. सातवाहनांचे राज्य हल्लीचा महाराष्ट्र व आंध्रप्रदेशापासून तो मध्यभारतातील सांचीपर्यंत विस्तारलेला होता. नाणेघाट येथे सापडलेल्या इसवी सनाच्या पहिल्या शतकातील राणी नागनिकेच्या शिलालेखात सातकर्णी राजाचा उल्लेख दक्षिणपथाधिपती असा आहे.

सातवाहन काळातील नाणेघाट व तेथील जकातनाके प्रसिद्ध आहे. गेली ३००० वर्षे तरी महाराष्ट्रातून पश्चिमसमुद्रामार्गे परदेशांशी व्यापार चालू आहे. सातवाहन काळानंतरच्या नहपानाच्या शिलालेखात लाखोंनी दाने दिल्याचा उल्लेख आहे .त्यावरुन त्याकाळी पश्चिम महाराष्ट्रात परदेशांशी होणाऱ्या व्यापारांमधून अलोट संपत्ती येत असावी. त्या काळी महाराष्ट्रातील राजवटींमध्ये आपापसात तसेच शेजाऱ्यांशी सतत लढाया चालू असत.

महाराष्ट्रात जसजसे चालुक्य व राष्ट्रकुट सम्राटांचे साम्राज्य वाढू लागले तसतशी घोड्यांची आवश्यकता वाढून परदेशांतून - विशेषत: इराणमधून होणारी घोड्यांची आयात वाढू लागली. तेराव्या शतकात महाराष्ट्र व गुजरातच्या बंदरात येणाऱ्या प्रत्येक जहाजात घोडे असल्याचा उल्लेख मार्को पोलो या प्रवाशाने केलेला आहे. महाराष्ट्रातील ही घोडदळांची परंपरा व तिचे महत्त्व पुढे शिवकाळापर्यंत, त्यानंतर मराठेशाहीत व ब्रिटीश काळामध्येही (Maratha Cavalary) च्या रुपात चालू राहिल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्र समाज**

भारतीय लोकांचा मूळ वंश कोणता हे सांगणे जितके अवघड आहे ,त्यापेक्षा महाराष्ट्रीय माणसांचा मूळ वंश कोणता हे सांगणे जास्त अवघड आहे. इतिहासपूर्व प्राचीन काळात महाराष्ट्रात राहात असलेल्या माणसांबद्दल व त्यांच्या संस्कृतीबद्दल माहिती पुरातत्वीय उत्खननामधून मिळते. तापी, गोदावरी व कृष्णा नद्यांच्या काठी झालेल्या उत्खननात पहिल्या अश्मयुगातील सुमारे ५ लक्ष वर्षांपासून दगडाची हत्यारे व मानवी अस्थी सापडल्या आहेत.

महाराष्ट्रात तापीकाळी बहाळ, टेकावडा, प्रकाशे, सावळा व बहुरुपा, गोदावरीकाठी नासिक व पैठण, प्रवरेकाठी जोर्वे, दायमाबाद, नेवासे, वर्धा नदीकाठी पवनार इत्यादी भागात उत्खनने झाली आहेत. त्यामधून नवाश्मयुग व ताम्रयुगीन अवशेष सापडतात. त्यावरुन महाराष्ट्रात सुमारे २ लक्ष वर्षांपूर्वी मानवी संस्कृती होती, असे अनुमान काढता येते. मध्ये अश्मयुग व नवाश्मयुगातील मानववस्तीचे अवशेष महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील कर्नाटकात आढळतात.

तर ताम्रयुगाचे पुरावे नर्मदेच्या उत्तरेकडील राजस्थान व मध्यभारत या भागात आढळतात. परंतु महाराष्ट्रात मात्र तापी व गोदावरी यांच्या खोऱ्यांत नवाश्मयुग व ताम्रयुग यांचे अवशेष एकत्रच आढळतात. म्हणून महाराष्ट्रात उत्तरेकडील संस्कृती व दक्षिणेकडील संस्कृती या दोन्हींचाही प्रभाव पडला आहे, असे गृहीत धरले जाते. त्यांस पोषक असे पुरावे बरेच देता येतात. महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान

वैशिष्ट्यपूर्ण असल्याने उत्तर व दक्षिण भारतातील लोकांना एकमेकांशी संपर्क ठेवताना महाराष्ट्र ओलांडून जाण्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे असा प्रभाव पडणे स्वाभाविक आहे.

त्यामुळे उत्तरेकडील वैदीक आर्य व दक्षिणेकडील द्रविड अशा दोन्ही वंशाच्या लोकांमधून हल्लीचा महाराष्ट्रीय समाज निर्माण झाला असावा असे एक मत आहे. वेदपूर्व काळातील सिंधू संस्कृती अथवा हडप्पा संस्कृतीबद्दल अलीकडे जे काही संशोधन उजेडात आले आहे त्यानुसार ह्या संस्कृतीचा प्रसार फक्त वायव्य व उत्तर भारतापुरता सिमीत न राहता तिच्याखाली दक्षिणेकडे गुजरात व महाराष्ट्रामध्ये नगर जिल्ह्यात प्रवरेकाठी दायमाबाद येथे सापडलेले अवशेष पाहता सिंधू/हडप्पा संस्कृती तिच्या शेवटच्या काळात तरी महाराष्ट्रापर्यंत पोचल्याचे दिसून येते. त्यावरुन आपणांस महाराष्ट्राच्या काही भागात तरी कास्ययुगाच्या काळात (इ.स.पू. २५०० ते इ.स.पू. १५००) नागरी जनजीवन अस्तित्वात होते, असे अनुमान काढता येते.

बाहेरून येणारे आक्रमण व पर्यावरण बदल यामुळे उत्तरेकडील पंजाब, सिंध, राजस्थान या भागातून ही संस्कृती नष्ट झाली. पण गुजरातेत मात्र ही संस्कृती नाश न पावता नंतरच्या संस्कृतीत विलीन झाली. महाराष्ट्रातील हडप्पोत्तर अथवा उत्तर-सिंधू संस्कृतीबद्दल हे मत कितपत ग्राह्य आहे, याचा ठाम पुरावा अजून उपलब्ध नाही. या संस्कृतीचे लोक महाराष्ट्राचे मूळ निवासी असण्याची शक्यता थोड्या प्रमाणात तरी आहे.

पण महाराष्ट्रातील प्राचीन वंशाचा व वसाहतीचा विचार करण्याअगोदर भारतातील वैदिक आर्यांचे मूळस्थान ठरविणे आवश्यक आहे. गेल्या ३०-४० वर्षात झालेल्या पुरातत्वीय संशोधनानुसार मध्य आशिया हे आर्य लोकांचे मूळ वसतीस्थान असून आर्य लोक हे कझाकिस्थानातून बाल्ख देश (बॅक्टिया) ओलांडून गांधार प्रदेशात (सध्याचा अफगाणिस्थान) म्हणजे आर्यावर्तात उतरले. बाल्ख हाच महाभारतात वर्णन केलेला बाल्हीक देश. पांडुची बायको माद्री हिचा उल्लेख बाल्हीकी असा महाभारतात केलेला आहे. त्याव्यतिरिक्त अगदी अलिकडे मांडलेला सिद्धांत म्हणजे आय लोक बाहेरुन भारतात आले नसून ते मूळ भारतातीलच होते.

प्रा. लाल आणि प्रा. ए.स. आर. राव यांनी केलेल्या संशोधनानुसार उत्तर-सिंधू/उत्तर हडप्पा संस्कृतीच्या काळातील लोक हेच ऋग्वेद कालीन आर्य लोक होते. ही उत्तर-सिंधू संस्कृती महाराष्ट्रात दायमाबादपर्यंत पोहोचल्याचे दिसते. दायमाबाद येथे जो ब्राँझचा रथ उत्खननात मिळाला आहे, तो ऋग्वेदातील आर्य लोकांच्या रथाच्या वर्णनांशी खूप मिळता जुळता आहे. ऋग्वेद काळ हा इ.स.पू. २००० ते इ.स.पू. १५०० इतका असावा असे सध्या मानले जाते. ताम्रपाषाण काळ हा इ.स.पू. २२५० ते इ.स.पू. ११४० असा मानला जातो. या काळात उत्तर-सिंधू/उत्तर हडप्पा संस्कृतीची व्याप्ती दायमाबादपर्यंत पोहोचल्या कारणाने तेच आजच्या महाराष्ट्रीय समाजाचे पूर्वज असावेत, असे मानण्यास आधार आहे.

एक मत असे आहे की, भारताच्या वायव्य व उत्तर भागातून पशुपालक आर्य लोक भारतात आल्यावर भौगोलिक परिस्थितीनुसार उत्तर भारतात

शेती करीत स्थिर झाले. साधारण याच दरम्यान किंवा त्यांच्या अगोदर भारताच्या ईशान्येकडील पर्वतमय प्रदेशातून व निबीड अरण्यातून मानख्मेर भाषा बोलणारे खोंड, संताळ व कोरकू हे लोक दक्षिण चीन व ब्रह्मदेश या देशांमधून भारतात आले. त्यांनीच आपणाबरोबर तांदळाचे पीक काढण्याची कला भारतात आणली. पण आर्य लोक हे अधिक आक्रमक व प्रभावी असल्याने त्यांनी भारताचा चांगला व सुपीक भूभाग व्यापला आणि खोंड, संताळ, कोरकू यांना डोंगर भागात व रानावनात मागासलेल्या स्थितीतच राहावे लागले. (अग्निहोत्री : १९७७ : ४५) यापैकी कोरकू लोक उत्तर महाराष्ट्रात अजूनही मेळघाट परिसरात मोठ्या प्रमाणावर आहेत.

दुसरे मत असे की, गोंड, कोरकू, भिल्ल, कोळी, कोलाम, वारली, गोवारी, कातकरी, ठाकर या ज्या आदिवासी जमाती आज महाराष्ट्रात आहेत त्यांचे अत्यंत प्राचीनकालीन पूर्वज द्रविडी संस्कृतीचे होते व ते उत्तर भारतात राहात होते. आर्य लोक बाहेरुन आल्यानंतर या दोन्ही वंशाचा संघर्ष होऊन त्यात द्रविडी संस्कतीच्या लोकांचा बिमोड झाला व त्यांना दक्षिणेकडे आश्रय घ्यावा लागला. (डिसकळकर : १९६४)

वरील दोन्ही मते तपासून पाहण्यासाठी त्यादृष्टीने महाराष्ट्रातील आदिवासींचा अभ्यास होणे आवश्यक आहे. मानवशास्त्र विषयाच्या अभ्यासात आदिवासी संस्कृतीचा अभ्यास हा मूळ गाभा आहे. मानवशास्त्र विषयाची उत्पत्तीच मुळी आदिवासींच्या अभ्यासातून झाली. मानवशास्त्रीय तत्त्वांनुसार संस्कृती ही एखाद्या नदीच्या प्रवाहासारखी वाहती असते. नदीचा प्रवाह वाहत असताना पात्रातील तसेच काठांवरील भागांमध्ये, वस्तुंमध्ये बदल करीत असतो. त्याचप्रमाणे संस्कृतीचा प्रवाह त्या सांस्कृतिक बंधाने बांधलेल्या समाजामध्ये तसेच संस्कृतीच्या परिघांना स्पर्श करणाऱ्या म्हणजे काठांवरील अथवा शेजारी समाजामध्येही बदल अभिप्रेरीत करीत असतो.

बदल न होता कोणतीही संस्कृती टिकू शकत नाही. नदीचा प्रवाह थांबला की पाणी साठून त्याचे डबके होते, तसेच संस्कृतीचा प्रवाह थांबला, त्यात बदल सामावून घेतले नाही तर संस्कृती मृतप्राय अथवा नष्ट होते. पण कधी कधी नदीच्या पात्रात काही नैसर्गिक कारणांनी लहानलहान बेटे तयार होतात. त्या बेटावरील वस्तुमात्रांचे स्वरुप नदीच्या पात्रातील व काठावरील वस्तुमात्रांच्या स्वरुपाशी तुलना करता फारसे न बदललेल्या रुपात टिकून राहते. त्याचप्रमाणे संस्कृतीच्या वाहत्या प्रवाहात काही नैसर्गिक अथवा मानवी कारणांमुळे काही मानवसमूह अलग पडतात व संस्कृती प्रवाहाबरोबर न बदलता बऱ्याचशा मूळ स्वरुपात प्रवाहातल्या बेटांप्रमाणे आपले वेगळेपण व मूळ रुप दाखवित राहतात.

आज आपणास दिसणारे दुर्गम भागातील विविध आदिवासी ही संस्कृती प्रवाहातील मानवी बेटेच आहेत. त्यामुळे त्यांच्या रुढी, परंपरा, शारीरिक ठेवण यांच्या अभ्यासातून आपणास आपल्या प्राचीन काळातील रुढी, परंपरा इ. चे मूळ स्वरुप समजून घेणे शक्य होते. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील हल्लीच्या वारली आदिवासींची चित्रशैली आणि मध्यप्रदेशातील

भीमबेटका येथे सापडलेल्या १०,००० वर्षापूर्वीच्या प्रागैतिहासिक काळातल्या गुहांमधून राहणाऱ्या आदिमानवांची चित्रशैली यामध्ये विलक्षण साधर्म्य आहे. त्यावरुन हल्लीच्या वारली जमातीच्या इतिहासाबद्दल अनुमान काढण्यास वाव आहे. महाराष्ट्रात भिल्ल, कातकरी, कोरकू, ठाकर, कोळी, कोकणा, वारली, रामोशी, पारधी इ. आदिवासी जमाती अद्यापी आहेत. त्यांचे या दृष्टीने अधिक संशोधन झाल्यास महाराष्ट्राच्या प्रागैतिहासिक काळावर प्रकाश पडण्यास मदत होईल.

कोणत्या का मार्गाने पण इतिहासपूर्वकाळी आर्य व द्रविड लोकांमध्ये प्रथम राजकीय व नंतर सांस्कृतिक दळणवळण होऊन त्यांनी एकमेकांच्या काही कल्पना उचलल्या व त्यांचा संस्कृतीसंकर होऊन आजच्या महाराष्ट्रीय माणसांचा मूळ वंश उत्पन्न झाला असे मानावयास प्रत्यवाय नसावा. पण प्राचीन भारतात ज्यांचा उल्लेख अनेकवार येतो ते नाग कुळाचे लोक कोण असावेत हा प्रश्न उरतोच.

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या म्हणण्यानुसार आजच्या महाराष्ट्रातील महार लोक हे प्राचीन नागकुळाचे वंशज आहेत. त्यासाठी ते महार समाजात प्रचलित असलेला मायनाक (माय + नाक : नाग), नाथनाक अशासारख्या नावांच्या प्रत्ययाचा आधार घेतात. त्याचप्रमाणे महारांमधील खरात हे आडनांव क्षहरात या नागकुळापासून आले असल्याचे ते प्रतिपादन करतात. महाभारतानंतरच्या काळात बाहेरुन भारतात येऊ लागलेल्या आभीर टोळ्यांनी द्वारका व तिच्या परिसरावर हल्ले करुन यादव कुळांचा नाश केल्याचे उल्लेख आढळतात. इ.स.पू. १००० वर्षांपूर्वी आलेले हेच लोक इ. सनाच्या पहिल्या शतकापर्यंत खानदेश व गोदावरी काठच्या भागात चांगलेच स्थिर झाल्याचे दिसतात. त्यांचा उल्लेख पहिल्या शतकातल्या गाथा सप्तशतीमध्ये आहे (गाथा क्र. ८०४). पुढच्या ऐतिहासिक काळात याच टोळ्यांनी काठेवाड, गुजरात व उत्तर महाराष्ट्रात राज्य केल्याचे दाखले आहेत. तेव्हा त्यांना आहीर म्हणत व आजच्या खानदेशातील अहिराणी बोली ही याच आभीर टोळ्यांच्या वंशजाची असावी (कर्वे : १९६७). पुढे आभीरांनी यादवांशी संबंध जोडून क्षत्रियत्व मिळवले व यादववंशी कृष्णाला देव बनवून आपल्यात सामावून घेतले.

ही झाली इतिहासपूर्व काळातील गोष्ट. त्यापुढील काळातही इ.स. च्या सुरुवातीपासून सौराष्ट्र व उत्तर हिंदुस्थानात शक, यवन, पल्हव इत्यादी लोकांची आक्रमणे होत होती. त्यापैकी बरेचसे लोक इथे स्थायिकही होत. अशोकाच्या काळातच लोक उत्तरेकडून, पूर्वेकडून महाराष्ट्रात धर्मप्रसारासाठी येऊ लागले होते. सातवाहनांच्या राज्यात मध्यभारतातील सांचीपर्यंतचा भाग होता. वाकाटक काळात वाकाटकांचे उत्तरेकडील गुप्त घराण्याशी संबंध आले. राष्ट्रकुटांच्या स्वाऱ्या उत्तरेत गंगेच्या काठाकाठाने होत होत्या.

गुजरातेतील यादव घराणे गुजरातमधून येऊन महाराष्ट्रीय समाजात मिसळून गेले होते. या सर्व गोष्टींमुळे उत्तरेकडून दक्षिणकडे येणाऱ्या लोकांची वर्दळ वाढली. त्यात नंतर बाहेरून येणाऱ्या लोकांची भर पडली. सीमेवरील समाजांना राजकीय व सांस्कृतिक आक्रमणांना तोंड द्यावेच लागते. त्यामुळे

ते मिश्र वंशाचे व त्यांचे आचार विचारही मिश्र स्वरुपाचे होणे अपरिहार्य असते. शिवाय उत्तर व दक्षिण भारतातील लोक एकमेकांच्या प्रदेशात जात येत असताना महाराष्ट्र त्यांच्या पायाखालच्या वाटेवर होता. दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर व्यापारी बंदरे होती. तेथून निघणारे मार्ग भारताच्या इतर भागामध्ये जात. व्यापारी मार्गावरुन वाहतूक होताना विविध लोकांशी संपर्क घडून त्यातून सांस्कृतिक सरमिसळ होणे स्वाभाविक आहे.

अशाप्रकारे चलनवलन होत असताना विविध वंशाच्या, भाषेच्या व संस्कृतीच्या लोकांचे एकमेकांत दळणवळण वाढून त्यांनी एकमेकांचे आचारविचार उचलले आणि अनेक वांशिक व भाषिक लोकसमूहांचा मिळून हा एकजिनसी महाराष्ट्र समाज बनला. त्यामुळे महाराष्ट्रात आर्य कोण, द्रविड कोण व मूळ रहिवासी कोण हे ठरविणे अशक्यच आहे. इतक्या प्रदीर्घ काळामध्ये अनेक वंशाची, भाषांची इतकी सरमिसळ झाली आहे की, वांशिक व भाषिक ऐक्य ठरविता येणे कठीण आहे.

## महाराष्ट्र संस्कृती

पण एक गोष्ट मात्र निश्चित की या मिश्र महाराष्ट्रीय समाजाच्या चालीरिती व धार्मिक कल्पनांमध्ये उत्तर भारतीय व दक्षिण भारतीय अशा दोन्हीं संस्कृतींची छाप दिसते. द्रविड संस्कृतीस मान्य असलेला आतेमामे भावंडाचा व काही ठिकाणी मामा-भाचीचा लग्नसंबंध महाराष्ट्रात अजून समाजमान्य आहे. मराठी जेवणाची पद्धती पाहिली तरी गहू व तांदूळ या अनुक्रमे उत्तर व दक्षिण भारतातील प्रमुख धान्याचा समावेश आपल्या जेवणात असतो. जिलेबी हे पक्वान्न उत्तर भारतीयांकडील, तर करंजी, कडबोळी हे दक्षिण भारतातील; पण दोन्ही महाराष्ट्रातील प्रमुख पक्वान्ने. महाराष्ट्रातील स्त्रियांचा पोषाख द्रविडांशी मिळता-जुळता वाटतो. त्यांच्या दागिन्यातील मंगळसूत्र द्रविड संस्कृतीतून तर नथ उत्तरेकडील संस्कृतीतील आपलेसे केलेले आहे आणि दोन्ही महत्त्वाचे सौभाग्य अलंकार मानले जातात. मराठी लग्नविधीतील अंगाला हळद लावणे, देवक बसविणे इ. विधी द्रविड संस्कृतीतील आहेत, तर लाजाहोम, सप्तपदी हे अग्निपूजक आर्यसंस्कृतीतील विधी आहेत.

महाराष्ट्रातील समाजाने आर्यांची अग्निपूजा स्वीकारली आणि द्रविडांची नागपूजा, वृक्षपूजा पण मान्य केली. वैदिक आर्य हे विजिगीषु व कर्मवादी तर द्रविड मूलत: भावनावादी. महाराष्ट्राने मात्र ज्ञानेश्वरांनी सांगितलेला भगवद्‌गीतेतील कर्मयोगही स्वीकारला आणि सगुण भक्तीमार्गाचापण स्वीकार केला. मराठी भाषा ही आर्यांच्या संस्कृत भाषेपासून मुख्यत: विकसित झालेली असली तरी तीवर कर्नाटकाकडील द्रविडी भाषेचे संस्कारही मोठ्या प्रमाणावर आहेत.

महाराष्ट्रातील समाजाच्या धार्मिक कल्पनांमध्ये आर्य, द्रविड अथवा उत्तर-दक्षिण संस्कृती संगम मोठ्या प्रमाणावर दिसतो. शिवशंकर हा मूळचा अनार्य द्रविडांचा देव. महाराष्ट्रात शिवाची उपासना अत्यंत प्राचीन काळापासून चालू आहे. भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी पाच एकट्या महाराष्ट्रातच आहेत. महाराष्ट्रात सर्वात जास्त देवळे

शंकराची आहेत. प्रत्येक गावात एक तरी शंकराचे मंदिर असते आणि शिवालयाचे पुजारी आर्यांच्या वर्णव्यवस्थेतील ब्राह्मण नसतात, तर गुरव किंवा जंगम असे मराठी बहुजन समाजातील लोक असतात. विष्णू हे दैवत वैदिक आर्यांच्या सूर्य वा आदित्य या मूळदैवतातून विकसित झालेले. संस्कृती संकराच्या सुरुवातीच्या काळात तरी या दोन्ही दैवतांच्या उपासकांमध्ये फार मोठा संघर्ष झाला व दक्षिणेकडे कट्टर शैव (स्मार्त) व कट्टर वैष्णव असे परस्पर विरोधक पंथ निर्माण झाले.

परंतु महाराष्ट्राने मात्र शैव व वैष्णव हा वाद दत्त संप्रदायांची निर्मिती करुन सामोपचाराने सोडवला. उत्तरेकडील वैदिक आर्यांचे विष्णू व ब्रह्मा हे प्रमुख देव व दक्षिणेकडील द्रविडांचा शिव हा मुख्य देव या तिघांचे संमेलन एकाच दत्तात्रय अवतारात करून महाराष्ट्राने वर आणखी दत्तात्रयांचे गोत्र अत्री असे मानून 'अत्री व सर्वांशी मैत्री' असेच सर्वसमावेशक सामंजस्याचे धोरण ठेवलेले दिसते. भारतातील इतर कोणत्याही प्रांतापेक्षा महाराष्ट्रात दत्त उपासना फार मोठ्या प्रमाणावर केली जाते. महाराष्ट्रात दत्त उपासना नवव्या शतकात सुरु झाली व तेराव्या शतकात तिचा महिमा वाढला. त्या काळातील महानुभव पंथियांनी कृष्णाबरोबर दत्तही आपले मुख्य दैवत मानले होते.

मातृप्रधान द्रविड समाजात प्रामुख्याने चालणारी देवीची उपासना पुढे पितृप्रधान आर्य समाजानेही स्वीकारली आणि महाराष्ट्रीय संस्कृतीने विविध रुपातील देवींचे विविध देवांशी विवाह झाल्याच्या कथा रचून हा संस्कृतिसंगम सुकर केला.

यादवकालीन महाराष्ट्रात नाथ संप्रदायांचा प्रसारही मोठ्या प्रमाणात होता. नाथपंथ हा मुळात काश्मिरमध्ये उत्तर भारतात उदयाला आला, तरी तो महाराष्ट्रात स्थिरावला. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात नाथसंप्रदायाचे विशेष स्थान आहे. त्याचा प्रसार महाराष्ट्रातील महानुभाव, दत्त व वारकरी संप्रदायावर उमटलेला दिसतो. महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी हे मूळचे गुजरातमधील असले तरी आपला पंथ स्थापण्यास त्यांनी महाराष्ट्राची निवड केली.

अशाप्रकारे भिन्न प्रकृतीचे, भिन्न प्रवृत्तीचे लोक एकत्र आले. त्यांनी एकमेकांचे आचार-विचार उचलले, पुढे त्यांच्या संस्कृती एकमेकांत मिसळल्या. त्यांनी एकमेकांच्या देवधार्मिक कल्पना स्वीकारल्या व त्यातूनच उत्तर व दक्षिण भारताला जोडणारी महाराष्ट्र संस्कृती निर्माण झाली. या लेखात उल्लेख केलेली उदाहरणे केवळ प्रातिनिधीक आहेत. एकंदर सर्वांगीण महाराष्ट्रीय संस्कृतीचा बारकाईने विचार केला असता त्यामागे दृष्य वा अदृष्य स्वरुपात असलेली उत्तर आणि /किंवा दक्षिण भारतीय संस्कृतीची रुपे कधी पुसट तर कधी स्पष्टपणे दिसतात. म्हणून महाराष्ट्र संस्कृतीला उत्तर व दक्षिण भारतीय संस्कृतीला जोडणारा सेतू किंवा सांधा (Cultural bridge किंवा Cultural buffer) असे म्हटल्यास ते समर्पक व सार्थ ठरावे.

### महाराष्ट्र समाज व संस्कृती

अशा या गुणग्राहक व सर्वसमावेशक संस्कृतीला आश्रय देणारा व तिच्या आश्रयाने वाढणारा समाज कसा होता ? कोणत्याही भूभागात

राहणाऱ्या लोकांची स्वभाव वैशिष्ट्ये, त्या भागातील पर्यावरण, भौगोलिक परिस्थिती, इतिहास व संस्कृती यानुसार ठरत असतात. आज आपण ज्याला महाराष्ट्राची अस्मिता, मराठी बाणा वा मराठी मन असे म्हणतो ते नक्की काय आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपण इतिहासातील काही प्राचीन व काही अर्वाचीन दाखले पाहू. (इथून पुढे काही ठिकाणी महाराष्ट्री शब्दाला पर्याय म्हणून मराठी असा शब्द वापरला आहे, तो जातीवाचक नसून भाषावाचक किंवा संदर्भानुसार प्रदेशवाचक समजावा.)

सातव्या शतकामध्ये इ.स.६२५ ते ६४९ या काळात भारतात आलेल्या चिनी बौध्द भिक्षुक ह्यू-एन्-त्संग (किंवा युआन च्वांग) याने महाराष्ट्रात पुलकेशीच्या राज्याला भेट दिली असता मराठी लोकांच्या शौर्याची व लढवय्येपणाची मुक्तकंठाने स्तुती केली आहे. तो लिहितो की 'मराठे लोक हे साधे असून प्रामाणिक आहेत. त्यांचा स्वभाव निग्रही व करारी आहे. त्यांचा कोणी अपमान केला तर ते केव्हाही सहन करणार नाहीत. मग त्यात त्यांच्या प्राणावर संकट आले तरी ते त्याला भीत नाहीत. मराठे लोक मोठे अभिमानी आहेत. कोणी त्यांचे कल्याण केले तर ते कृतज्ञ असतात. पण कोणी त्यांचे नुकसान केले तर ते त्याचा सूड घेतल्याशिवाय राहत नाहीत'. त्यापुढील काळात इ.स. ७७८ मध्ये गुजरातमधल्या उद्योतनसूरीने 'कुवलयमाला' या ग्रंथात 'मरहट्टे' हे बळकट, ठेंगणे, सावळ्या रंगाचे, काटक आणि 'अहिमाने कलहसीले' म्हणजे अभिमानी व भांडखोर असतात, असे वर्णन केलेले आहे. मुक्तेश्वराच्या महाभारतातही (इ.स. १६५०) मराठ्यांच्या लढवय्येपणाचे वर्णन करुन ते 'मरे तो न हरणारे' असल्याची ग्वाही दिली आहे. अशाप्रकारे इतिहासकाळात चीनसारख्या भारताबाहेरील दूरस्थ देशातील लोकांनी व गुजरातसारख्या शेजारील प्रदेशातल्या लोकांनी केलेल्या वर्णनांची तुलना करुन पाहता मराठी स्वभावाचे वर्णन स्पष्ट व वस्तुनिष्ठ वाटते. त्यामधून मराठी माणसाचे कृतज्ञता, निष्ठा, स्वाभिमान, स्वसंरक्षणाची क्षमता हे गुण प्रकर्षाने उठून दिसतात.

पुढल्या काळात 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' या आपल्या ग्रंथात न्यायमूर्ती रानडे लिहितात की, व्यक्तीस्वातंत्र्याचे प्राबल्य महाराष्ट्रात फार असल्याने महाराष्ट्रातील लोकांमध्ये स्वातंत्र्यप्रियता आणि परस्परांना मदत करण्याची इच्छा हे गुण साहजिकच उत्पन्न झाले. धर्माचे आग्रही रुप महाराष्ट्रात आढळून येत नाही. महाराष्ट्रावर कोणत्याही एकाच राजसत्तेचा अंमल फार वेळ कधीच टिकला नाही. उलट एकछत्री अंमल चालू न देण्याबद्दल त्यांनी सतत खटपट चालविलेली दिसते. उत्तरेकडील आलेल्या शत्रूंस पादाक्रांत करण्यास एकजुटीने ते नेहमीच तयार असतात. महाराष्ट्रात राज्यसत्ता ही राष्ट्रीय चळवळ होती. हा सर्व राष्ट्राचा एकूण एक वर्णांनी या जातीनी मिळून केलेला देशोद्धार होता. मराठ्यांचा इतिहास म्हणजे खऱ्या अर्थाने हिंदी राष्ट्राच्या रचनेचा इतिहास होय (अत्रे व कुलकर्णी : १९६०).

मराठ्यांच्या इतिहासाचे कार्य विशद करताना इतिहासाचार्य राजवाडे आपल्या ऐतिहासिक प्रस्तावनेत (इ.स. १८९८) लिहितात की,

'मराठ्यांचे हिंदुस्थानात मुख्य कार्य म्हणजे महाराष्ट्र धर्माचा प्रसार करणे हे होय. हिंदुधर्म, स्वराज्य व गोब्राह्मण प्रतिपालन या तीन गोष्टींची स्थापना करावयाची म्हणजे राष्ट्रातील लोकांची एकी झाली पाहिजे व त्या एकीचा पुढाकार करावयास कर्त्या लोकांनी पुढे सरसावले पाहिजे, ही कल्पना सिद्ध करुन दाखविण्यास जी तडफ, जो निश्चय, जी जूट व जो पुढारीपणा लागतो त्याचे अस्तित्व त्या काळी मराठ्यांच्या अंगी होते व म्हणून त्यांच्या हातून स्वराज्याची स्थापना होऊन हिंदुधर्म व गोब्राह्मणांचे प्रतिपालन झाले'.

वरील वर्णन पाहिली असता असे दिसते की, महाराष्ट्राची भौगोलिक जडणघडण व ऐतिहासिक वारसा हे तेथल्या रहिवाशांच्या - मराठ्यांच्या - स्वभावात उतरले आहेत. विशिष्ट भागात राहणाऱ्या मानवसमूहाच्या स्वभावावर तेथल्या भौगोलिक परिस्थितीचा परिणाम होणे अपरिहार्य ठरते. महाराष्ट्राला निसर्गत:च सह्याद्री, सातपुडा, सातमाळा व अजंठा या पर्वतरांगांच्या भिंतींचे संरक्षण मिळाल्याने तो काहीसा अलग पडलेला आहे. या भौगोलिक अलगतेमुळे मराठ्यांमध्ये स्वावलंबन, आत्मविश्वास, मितभाषीवृत्ती हे गुण आले आहेत व त्यांचा स्वभाव काहीसा घुमा झाला आहे (ग्लुश्कोवा : १९८९).

या प्रदेशात लहानमोठ्या टेकड्या असून जमीन बरड व मुरमाड आहे. त्यामुळे शरीर काटक व बळकट होण्यास मदत होते. महाराष्ट्राचा काही भाग दुष्काळी छायेचा प्रदेश मानला जातो. जमीनही फारशी सुपीक नाही. त्यामुळे जी काही मर्यादित नैसर्गिक व स्वसंपादित साधनसामुग्री आहे तिचे रक्षण, संवर्धन करण्यासाठी जागरूक राहून जपावे लागते. त्यामुळे मराठी माणसाचा स्वभाव स्वत:च्या हक्काबद्दल जागरूक व भांडखोर बनला असणे शक्य आहे. महाराष्ट्रात डोंगराळ प्रदेश जास्त असल्याने अशा प्रदेशात उपयोगी व सोयीस्कर होऊ शकेल असे घोडा हे वाहन लोकप्रिय झाले. मराठी पुरुषांचे दुटांगी धोतर आणि स्त्रियांचे सकच्छ लुगडे हा पोशाखही घोड्यावर बसण्यास सोयीस्कर म्हणून सर्वमान्य झाला. मराठी स्त्रियांच्या लढाईतील सहभागाची व घोडेस्वारीची उदाहरणे इतिहासात पुष्कळच पाहायला मिळतात. अहिल्याबाई होळकरांचे स्त्री सैन्य, राणी लक्ष्मीबाईच्या घोड्यावरील पराक्रम, शिवकालीन उदाबाई, ताराबाई, रायबागन इत्यादी रणझुंजार स्त्रिया ही नावे केवळ वानगीदाखल आहेत.

तसेच मराठ्यांचे स्वातंत्र्यप्रेम हे इतिहास काळापासून विख्यात आहे. महाराष्ट्राला लढायांचा प्रदीर्घ इतिहास असल्याने मराठी माणूस पराक्रमाचा पूजक, लढाऊ बाण्याचा व काही प्रमाणात आक्रमक झाला आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात मराठ्यांच्या पराक्रमाचा इतिहास प्रामुख्याने उठून दिसतो.

अगदी अलिकडच्या काळातील उदाहरणे पाहिली तर मोगलांची व इंग्रजांची परकी सत्ता देशातून उखडून टाकण्याचे प्रयत्न सर्वप्रथम महाराष्ट्रातच झाले. याला कारण म्हणजे प्राचीन महाराष्ट्रातला मराठी समाज हा युद्धजीवी होता. शिवकाळापासून ते उत्तर पेशवाईपर्यंत मराठी बहुजनसमाज पावसाळ्यात शेती तर उर्वरित काळात

मुलुखगिरी करीत असे. त्यामुळे महाराष्ट्राशेजारील प्रांतामध्ये मराठ्यांना पुंड, लढाऊ, अशीही नावे पडलेली आहेत.

मराठी समाजात अभिजात नृत्य-संगीत या ललित कलांची फारशी रुजवण झाली नाही. मात्र नाटक हे मराठी समाजाचे अतिशय आवडते असे अभिव्यक्तीचे साधन आहे. एक तर्क असा करता येतो की, नृत्यसंगीत या ललित कलांमध्ये स्त्रीचे स्थान बऱ्याच अंशी शारीर, लैंगिक पातळीवर राहते. इतर प्रांतियांच्या तुलनेने मराठी समाजात स्त्रियांचे स्थान बऱ्याच वरच्या पातळीवरचे असल्याने सुरुवातीच्या काळातील पौराणिक, कौटुंबिक नाटकांमधून काम करायला स्त्रियांना अडचण आली नसावी. महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाचे प्रमाण तसेच राजकारण व समाजकारण यातील स्त्रियांचा सहभाग भारतातील इतर प्रांताच्या मानाने बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आहे. आणि याची मुळे आपणास प्राचीन काळापर्यंत गेलेली आढळतात.

सातवाहन काळात पहिल्या शतकात लिहिल्या गेलेल्या गाथासप्तशतीमध्ये तत्कालीन ग्रामीण महाराष्ट्रात - विशेषत: गोदावरीकाठचा परिसर - स्त्रियांना मिळणारी मोकळीक, कुटुंबातील त्यांचे महत्त्व, त्यांना असलेला आदर व प्रेमाचे स्थान यांचे अनेक उल्लेख आहेत. त्यानंतरच्या काळातही मराठी समाजात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मान असे. त्यांना विद्यार्जन करण्याचा हक्क व धार्मिक चर्चा करण्याचा अधिकार होता. सातवाहन काळात नागनिका व गौतमी बलश्री आणि वाकाटक काळात प्रभावती गुप्ता या अत्यंत कर्तृत्ववान स्त्रिया महाराष्ट्रात होऊन गेल्या. प्राचीन महाराष्ट्रात सतीची चाल फारशी रुढ नव्हती. अद्यापही मराठी स्त्रियांमध्ये आत्मविश्वास, मोकळेपणा आणि सहजता इतर प्रांतातल्या स्त्रियांपेक्षा जास्त प्रमाणात आढळते असे इतर प्रांतियांचे मत आहे.

या ऐतिहासिक काळातल्या पार्श्वभूमीवर अगदी अलिकडच्या काळात म्हणजे इ.स. १९८९ या वर्षी इरीना ग्लुश्कोवा या रशियन संशोधिकेने महाराष्ट्रात मराठी समाजाच्या आणि संस्कृतीच्या अभ्यासासाठी राहून प्रसिद्ध केलेले मराठी लोकांचे स्वभाववर्णन पाहणे उपयुक्त ठरावे. या विदुषी मराठी संस्कृतीच्या अभ्यासका असून त्यांनी महाराष्ट्र समाज व संस्कृती या विषयावर बरेच लिखाण इंग्रजीतून प्रसिद्ध केलेले आहे.

People of Maharashtra या आपल्या लेखात मराठ्यांच्या इतिहासात खोल रुजलेल्या धार्मिक, अध्यात्मिक व तत्त्वज्ञानविषयक परंपरा, त्यांची सद्य:काळात होत असलेली जपणूक आणि त्यामधून प्रतित होणारे राष्ट्रीय ऐक्य व बंधुभाव यांचे कौतुक करुन ही विदुषी पुढे लिहिते की, ''मराठ्यांना आपल्या इतिहासाचा अतिशय अभिमान असून तो त्यांच्या धमन्यांमधून सळसळत असतो. विशेषत: शिवाजी त्यांचे जे दैवत आहे त्याचा त्यांना प्रखर अभिमान आहे. विसाव्या शतकापर्यंत भारताचे राजकीय नेतृत्व महाराष्ट्राकडे होते. भारतीयामध्ये आधुनिक राष्ट्रवादाची जाणीव जागृत करण्यात जे समाजधुरीण अग्रेसर होते त्यात गोपाळ कृष्ण गोखले, महादेव गोविंद रानडे व लोकमान्य टिळक हे मराठे प्रमुख होते.'' भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील

महाराष्ट्राच्या योगदानाची जाणीव मराठी माणसांच्या मनात जागृत आहे आणि त्यामुळेच की काय मराठी माणसाचा स्वभाव तापट, भांडखोर, (aggressive), करारी, दृढनिश्चयी (resolute), स्वतंत्र बाण्याचा (independent) काटक, धीट (hardy), उद्धट (arrogant), कावेबाज (cunning) आणि सामाजिक समतेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारा असा बनला आहे.

मराठी माणसांचे वागणे सहज व अकृत्रिम असते. तो शिष्टाचाराच्या औपचारिक चौकटीत गुंतून पडत नाही. मराठी भाषेत Thank you याला तंतोतंत प्रतिशब्द नाही. कारण मराठी मनाला उपकाराची भावना प्रकटपणे व्यक्त करणे मानवत नाही. कारण दोन व्यक्तींनी एकमेकांना मदत करणे, सहकार्य देणे हे मनुष्यमात्रांचे परस्परावलंबी संबंध लक्षात घेता त्यांचे कर्तव्यच आहे, अशी मराठी माणसाची धारणा आहे.. मराठी लोकांच्या जीवनशैलीवर संयम व मर्यादापालन (modration) यांची छाप दिसते.

मराठा लोक काटकसरी व मितव्ययी आहेत. कारण प्रामाणिकपणे मिळविलेला पैसा हेच बहुसंख्य मराठ्यांचे जीवनसाधन असते. श्रीमंतीचा देखावा करणे, भपकेदारपणा त्याज्य मानले जाते व संपत्तीचे प्रदर्शन करणे हे गावंढळपणाचे व हीन अभिरूचीचे लक्षण समजले जाते. भौतिक चैन, चंगळबाजी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर दिसत नाही. त्यापेक्षा मराठी माणूस आपला वेळ बौद्धिक चर्चासत्रे, वादविवाद सभा, नाटके आणि शास्त्रीय संगीत ऐकण्यात घालविणे पसंत करतो. मराठी माणसाचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्याचे बौद्धिक गुणग्राहकत्व व त्याला विद्येबद्दल वाटणारा पावित्र्ययुक्त आदर. त्यामुळे मराठ्यांमध्ये विद्येची उपासना व शिक्षणाबद्दल आत्मीयता मोठ्या प्रमाणात आढळते. त्यामुळेच शिक्षणाबद्दलचे बरेच नाविन्यपूर्ण प्रयोग महाराष्ट्रात झाले. स्त्री-शिक्षण व उच्च शिक्षणात दलित व स्त्रियांचा सहभाग यांचे पुरस्कर्ते महर्षी कर्वे, शाहूमहाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, जोतिबा फुले महाराष्ट्रातच होऊन गेले. कदाचित मराठ्यांच्या अंगी असलेली चिकाटी आणि त्यांचा काहीसा रुक्ष व घुमा पण स्पष्टदर्शी व नि:संदिग्ध स्वभाव यांचा त्यांना संशोधनासारख्या क्षेत्रात उपयोग होत असावा.

मराठी लोक तसे करारी, कडक (austere) आणि स्व-समीक्षक, स्वपरीक्षक आहेत... व्यापाराकडे मराठी माणसाचा कल नाही. पण आपल्यात असलेला व्यापारीवृत्तीचा अभाव हा बऱ्याच मराठ्यांना त्यांच्या उच्च दर्जाच्या बौद्धिक व सांस्कृतिक अभिरुचीचा पुरावाच वाटतो... मराठी लोक फारसे भावनाप्रधान नाहीत. भावनिक प्रदर्शनापेक्षा शक्यतो तर्कसंगती शोधण्याकडे त्यांचा कल असतो. मग ते राजकारण असो अथवा वैयक्तिक प्रेम.

मराठी माणसांच्या लेखी हळवेपणा, भावनावशता यांचे प्रदर्शन करणे हे दुबळ्या मनोवृत्तीचे लक्षण आहे. त्यामुळे तो वरपांगी रुक्ष व कठोर वाटतो, पण मराठा माणूस कधीच मैत्रीचे वा प्रेमाचे वचन देऊन ते मोडणार नाही. तसेच एकदा मनाने जवळ आल्यावर मराठा माणूस आदरातिथ्यात कधीच मागे हटत नाही. तीव्र स्वाभिमान हे एक

मराठ्यांचे गुणवैशिष्टच आहे. मराठ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव सदैव जागृत असते. म्हणून महाराष्ट्रात अनेक सेवाभावी संस्था व व्यक्ती काम करताना दिसतात. मदतीचा व सहकार्याचा हात सदैव पुढे करणारे, शब्दाला किंमत देणारे व तो पाळणारे, परंतु जर शत्रुत्व केले तर ते पिढ्यान्पिढ्या वागविणारे असे हे मराठे खरोखर आदरास पात्र आहेत. त्यांची संगतसोबत त्यांच्या सहवासात येणाऱ्या व्यक्तीच्या मनावर खोल व चैतन्यपूर्ण ठसा उमटवून जातो.

आपल्या निरीक्षणाला व मताला पुष्टी देण्यासाठी आपल्या लेखाच्या शेवटी श्रीमती ग्लुश्कोवा यांनी शिवाजीवर मूलभूत संशोधन प्रसिद्ध करणारे ख्यातनाम बंगाली इतिहास संशोधक श्री. सरकार यांचे मराठी माणसांबद्दलचे जे मत उदधृत केलेले आहे ते चिंत्य आहे.

सद्य:कालीन मराठी वर्ग पाहिल्यास त्यांची बौध्दिक तल्लखता, तीक्ष्ण बुध्दी व चलाखपणा (intellectual perspicacity) मेहनती व व्यासंगीवृत्ती (diligence) साधी राहणी; परंतु उदात्त, उच्च ध्येयाप्रती असणारी निष्ठा, विचारांना कृतीत आणण्याचे धैर्य, ठाम दृढनिश्चयी स्वभाव, लोकशाही मूल्ये व सर्वानुभूती समानता यांचा ध्यास या गुणांना भारताच्या इतर भागात तोड नाही. फक्त या गुणांना जर साधने आणि व्यक्ती यांना कौशल्यपूर्वक हाताळण्याची हातोटी, संघटनात्मक संरचना करण्याचे कौशल्य (organizational talent) दूरदृष्टी, सर्वांना एकत्र घेऊन जाण्याची वृत्ती (spirit of collectivism) आणि व्यवहारज्ञान या गुणांची जोड देता आली तर?

## उपसंहार

या लेखात सातव्या शतकातील तसेच गेल्या दहा वर्षापासून परदेशी प्रवाश्यांकडून केले गेलेले मराठी माणसाचे स्वभाववर्णन मुद्दामच सविस्तर व विस्तृतपणे उध्दृत केलेले आहे. जवळ जवळ १३०० वर्षाच्या कालावधीचा फरक असला तरी दोन्ही वर्णनात विलक्षण साधर्म्य आढळते. माणसांच्या संस्कृतीचे प्रतिबिंब त्यांच्या स्वभावात पडत असते, असा मानवशास्त्राचा सिद्धांत आहे. परंतु संस्कृती हळूहळू पण सातत्याने बदलत असते, असेही मानसशास्त्र सांगते.

मानवशास्त्रीय दृष्टिकोनातून मराठी समाजमनाचे विश्लेषण करावयाचे तर त्यासाठी मराठी संस्कृतीचा सांगोपाग, सर्वांगीण अभ्यास होणे आवश्यक आहे. तसेच त्यात मराठी साहित्य, वाङ्मय, कला, लोककला, व्यवहार व परंपरा यांचा अंतर्भाव होणे आवश्यक आहे. त्यामधूनच नवीन सांस्कृतिक सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी घडवून आणण्यास दिशा मिळतील.

आपल्या इतिहासापासून व सांस्कृतिक संचितामधून काही धडा घेऊन आपण मराठी माणसांनी आत्मपरीक्षण करून लवचिकवृत्तीने आपल्या स्वभावातील नकारात्मक गुण सकारात्मक बनविण्याचा प्रयत्न केल्यास मराठी समाज व संस्कृती अधिकच समृध्द होईल आणि एकविसाव्या

शतकात पुन्हा एकदा भारताचे बौध्दिक व सांस्कृतिक नेतृत्व करण्याइतपत परिपक्व होईल असा विश्वास बाळगायला हरकत नाही.

## संदर्भ व आधार


अत्रे प्र.के. आणि कुलकर्णी, कृ.पां.(१९६०) महाराष्ट्र गाथा, भारत प्रकाशन, मुंबई

अग्निहोत्री द.ह.(१९७७) मराठी संस्कृतीचे अधिष्ठान, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर-पुणे

कर्वे इरावती (१९५५) संस्कृती म्हणजे काय? किर्लोस्कर मासिक, फेब्रुवारी, १९५५

कर्वे इरावती (१९६७) युगांत, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स(प्रा.लि.) पुणे

डिसकळकर द.बा. (१९६४) महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे

जोशी शं. बा. (१९८०) मऱ्हाठी संस्कृती : काही समस्या, व्हिनस प्रकाशन, पुणे - दुसरी आवृत्ती

पेंडसे शं. दा (१९६५) महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे आणि त्यांचा साहित्यावर व संस्कृतीवर झालेला परिणाम, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे

विल ड्युरांट (अनुवाद मा. प. शिखरे) (१९६३) भारतीय संस्कृती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

शेणोलीकर ह. श्री. आणि देशपांडे प्र. न. (१९७२) महाराष्ट्र संस्कृती - घडण आणि विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर.

Glushkova. Irina (1989) Towns of Maharashtra. In Asia and Africa Today, No. 2, 1989.

Glushkova. Irina (1989) People of Maharashtra, In Asia and Africa Today, No. 3, 1989.

Glushkova, Irina and Feldhaus Anne, Ed. (1990) House and Home in Maharashtra, Oxford University Press

Karve, Irawati (1968) Maharashtra - Land and its People, Maharashtra State Guzetter, Government of Maharashtra, Mumbai

Pandian, Jacob (1995) The Making of India and Indian Traditions. Prentice Hall Inc, N.J.

Schewartzberg, Joseph E.ed. (1992) A Historical Atlas of South of South Asia. Second Impression. Oxford University Press.


या शोधनिबंधाचा मूळ मसुदा बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेच्या संगमनेर येथे भरलेल्या (३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर १९९९) तिसऱ्या अधिवेशनातील 'मराठी संस्कृती' या विभागात सादर करण्यात आला होता. हा लेख तयार करताना डॉ. विद्यागौरी टिळक, प्रपाठक, मराठी विभाग आणि डॉ. शौनक कुलकर्णी, मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ यांचे बहुमोल साह्य झाले. त्या दोघांचेही कृतज्ञतापूर्वक आभार.

●●●

# जव्हार-मोखाडा तालुक्यातील आदिवासी समाज

- प्रा. कामिनी पटेल

**जं**गलाचे राजे किंवा धरतीची लेकरं म्हणून ज्यांचा सर्वार्थाने उल्लेख करता येईल, अशा आदिवासी समाजाचं जग वेगळेच असते. जंगलात, डोंगर कपारीत राहणाऱ्या फळाफुलांच्या व झाडपाल्यांच्या चवीने समाधान पावणाऱ्या आदिवासींचे जीवन स्वच्छंदी पाखरासारखं असतं.

आदिवासींचे वास्तव्य दऱ्याखोऱ्यात व जंगलात असल्यामुळे त्यांना ''गिरीजन'' असेही म्हटले जाते. भारतीय संविधानात त्यांना ''अनुसूचित जमाती'' म्हणजे ''आदिवासी'' किंवा आदिम जाती संबोधले आहे.

१९९१ च्या जनगणनेनुसार भारतात ७% आदिवासींची लोकसंख्या आहे तर महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येपैकी ९.१९% लोकसंख्या आहे. महाराष्ट्रात धुळे, गडचिरोली, नासिक व ठाणे जिल्ह्यात आदिवासी जमातींची संख्या जास्त आहे. ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा हे दोन तालुके १००% आदिवासी तालुके आहेत. जव्हार हे पूर्वीचे संस्थानिक राज्य आहे. ह्या राजेशाहीचा मूळ पुरुष 'जायबा मुकणे' हा आदिवासीच होता. या दोन्ही तालुक्यात आदिवासींच्या महादेव कोळी, कोकणा, वारली, 'क' ठाकूर, कातकरी इ. जमाती आढळतात. महादेव कोळी हा समाज तसा पांढरपेशा समाज समजला जातो. इतर आदिवासी जमातीपेक्षा या जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे. स्त्री शिक्षणाचे प्रमाणही वाखाणण्याजोगे आहे. महादेव कोळी समाजाची आर्थिक परिस्थितीदेखील चांगली आहे. त्यामुळे त्यांचे राहणीमान इतर आदिवासी जमातीपेक्षा वेगळे किंवा जास्त चांगले आढळते. या जमातीत हिंदू समाजाची बरीचशी वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यामुळे महादेव कोळी इतर आदिवासी समाजापेक्षा वेगळे वाटतात.

आदिवासी समाजात वर्गरचना देखील आढळते. महादेव कोळी, कोकणा, ठाकूर ह्या वरच्या जाती मानल्या जातात. तर कातकरी ही खालची जात मानली जाते. वरच्या जातीतील समाज कातकऱ्यांकडे पाणी सुद्धा पीत नाही. कारण अजूनही कातकरी समाजातील काही कुटुंब गुरांचे मांस सेवन करतात. वारली जातीकडे देखील खालच्या नजरेनेच पाहिले जाते. लग्न मात्र आपापल्या जातीतच केली जातात. इतर जातीतील मुलगी लग्न करुन आणली तर नातेवाईक व समाजाचा रोष सहन करावा लागतो. आदिवासी समाजातील लग्नात मुलाला धान्याच्या स्वरुपात मुलीला हुंडा द्यावा लागतो. हे ह्या जमातीचे वेगळे वैशिष्ट्य आहे. कातकरी समाजाशी ''रोटी बेटी'' व्यवहार अजिबातच नसतो. किंबहुना आदिवासी पाड्यात फिरताना कातकऱ्यांची घरे एका बाजूला आढळतात.

आदिवासी समाज हा मुख्यत: मांसाहारी समाज आहे. ओले व सुके मासे त्यांना अतिप्रिय आहेत. मासे पकडण्यासाठी ते दिवसरात्र तहान भुकेची काळजी न करता छातीइतक्या पाण्यात

तासन्‌तास उभे असतात. मासे पकडण्यासाठी जाळे देखील हातानेच विणतात. रानातील पक्षी गलोलीने मारुन ते चवीने भाजून खातात. याशिवाय त्यांच्या आहारात नागलीची भाकरी, भात व तुरीची किंवा उडदाची घट्ट डाळ, भूजा म्हणजे भाजलेल्या उडदाचे पाण्यात कालवलेले पीठ मीठ टाकून वाटलेल्या सुक्या लाल मिरच्या, कांदा, रानातले कंद, कोवळ्या बांबूचे लोणचे हे पदार्थ आढळतात. सणासुदीला ते गोड करतात. गोड याचा अर्थ तांदळाच्या पिठात गूळ टाकून बनवलेले उंडे किंवा घावण. सणानुसार बोकडाचे किंवा कोंबड्याचे मटण ही असते.

या भागातील आदिवासी समाज हा भोळा, अबोल, पटकन दुसऱ्यावर विश्वास ठेवणारा, प्रामाणिक, दैववादी, परंपरांना पालीसारखा चिकटून राहणारा, निसर्गातच रमणारा असा आहे. त्यांची राहणी अत्यंत साधी व स्वच्छ असते. त्यांच्याकडे असलेली आत्मीयता,सचोटी, कष्टाळू वृत्ती हे गुण वाखाणण्यासारखे आहेत.

जीवनाकडे पाहण्याची त्यांची एक स्वतंत्र दृष्टी आहे. त्यांच्या जीवनामध्ये पैशाला फारसे स्थान नाही. आजच्या दिवसापुरते पोट भरले तरी तो समाधानी दिसतो. जमीन, जंगल, गुरे- ढोरे, कोंबड्या व सुदृढ शरीर हीच त्याची खरी संपत्ती आहे. त्यांची शेती ही संपूर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. ती पारंपरिक पद्धतीनेच केली जाते. शेतीतून धान्य उपभोगापुरतेच पिकवले जाते. या भागातील आदिवासी शेतकरी मुख्यत: भात, नागली हे पिकवतात. तसेच जास्त जमीन असल्यास वरई सारखे नगदी पीकही घेतात. शिवाय खुरसाणी, कुळीद, चवळी, तूर, तीळ ही पिकवले जाते. पावसाळ्यात परसबाग लावली जाते. यात मुख्यत: पितरांच्या नैवेद्यासाठी डांगर म्हणजे लालभोपळा लावला जातो. या शिवाय रानातले कंद, सुरण, वाल, झेंडूची फुले, तोंडली, काकडी, माठ, अंबाडी, दोडकी, शिराळी, भेंडी इ. भाजीपाला लावतात. एखाद्याकडे परस बागेसाठी जागा कमी असल्यास लाल भोपळा, माठ भाजी व झेंडूची झाडे इ. परसबागेत लावलीच जातात.

वर्षाला पुरेल इतके पीक आले नाही तर पूर्वी जंगलांवर गुजराण केली जायची. मात्र आता जंगलांचे प्रमाण कमी झाल्याने त्यांना पोट भरण्यासाठी शहरी भागाकडे तात्पुरते स्थलांतर करावे लागते. या स्थलांतराच्या काळात मालकाशी भांडण झाले किंवा गावची - घरची ओढ जाणवली तर रात्री-बेरात्री ते आपल्या गावाकडे पायी जायला निघतात. अशा वेळी थंडी-पाऊस, स्थलांतराचे ठिकाण आणि गावचे अंतर यांचा ते विचार करत नाहीत. इतकी गावची ओढ जबरदस्त असते. मात्र या सर्व परिस्थितीमुळे त्यांची आर्थिक परिस्थिती गरिबीची आढळून येते. असे असले तरी कुठलाही आदिवासी आपल्याला हसतमुखच आढळेल. जीवनाचा आनंद कसा लुटावा हे त्यांना खूप चांगल्या पद्धतीने माहीत आहे.

आदिवासींच्या मनात निसर्गाविषयी विलक्षण आदर आहे. निसर्गातील गूढ, अनाकलनीय असे जे असते ते पूज्यनीय असे ते मानतात. निसर्गातील आकाश, वीज, सूर्य, चंद्र, तारे, ढग, वाघ, चित्ता, साप, विंचू ह्या नैसर्गिक वस्तूंची ते पूजा करतात. हिमाई, हिरवा देव, वाघ्या म्हणजे वाघदेव, डोंगरदेव, वनदेव, गावदेव, कणसरी म्हणजे तांदूळ, धरतरी, पावस इ. देवदेवता ते मानतात व पूजतात.

आदिवासी आपल्या पूर्वजांना व पितरांना देव मानतात. गावच्या वेशीबाहेर लाकडाचे जे पुतळे असतात ते त्यांचे पूर्वज असतात. महालक्ष्मी, मारुती, खंडोबा, चामुंडा, महादेव, नारणदेव म्हणजे नारायण देव हे हिंदू देवही ते पूजतात. मोखाडा तालुक्यात महादेव कोळी हा समाज ज्या गावात जास्त आहे त्या गावांमध्ये हमखास एक तरी हिंदू देवताचे मंदिर दिसून येते.

आदिवासी समाजाचे असे काही वेगळे सण असतात. उदा. अखात्री म्हणजे अक्षय तृतीया, कोवळी भाजी, नवाखाना, बीज, नागपंचमी,वाघबारस, दिवाळी इ.

'कोवळी भाजी' हा सण पावसाळा सुरु झाल्यानंतर कोवळी नावाची भाजी उगवते. सणाच्या दिवशी ही भाजी गावदेवीला शेंदूर लावून नैवेद्य दाखवून खाल्ली जाते व नंतर भात लागवड म्हणजेच 'आवणीला' सुरुवात केली जाते.

नवाखाना या सणात नवीन भाताचे पोहे बनवून ते गावदेवीला - खळ्यांत, गुरांना खायला देऊन मग कुटुंबातील सर्व व्यक्ती एकत्र बसून खातात. बीज हा सण माघ महिन्यात साजरा केला जातो. यादिवशी ज्यांनी देवाला नवस केले असतील ते नवस फेडतात व रात्री उंडे बनवून खातात.

अखात्री हा त्यांचा महत्त्वाचा सण आहे. अखात्रीच्या पाच दिवस आधी बारा प्रकारची धान्य लहान मडक्यात पेरली जातात. या मडक्याला 'मोरद्या' म्हणतात. अखात्री पर्यंत रोज रात्री ह्या मोरद्याभोवती अखात्रीची खास गाणी गायली जातात. पारंपरिक तारपा, ढोल नाच सादर करुन सण साजरा केला जातो. नाच व गाणी हा आदिवासी समाजाचा अविभाज्य घटक आहे. पाच दिवसांनंतर मोरद्यातील धान्य चांगले उगवले तर पुढील वर्षी शेती चांगली होईल अशाप्रकारे ठोकताळे काढले जातात.

आदिवासी समाजाच्या सणाचे वैशिष्ट्य म्हणजे सगळे सण कौटुंबिक पातळीवर साजरे केले जातात. गावचा सण कधी करायचा यासाठी बारा गावांचा मिळून एक प्रमुख ठरवलेला असतो. तो व गावकरी सांगतील त्या दिवशी सण साजरा केला जातो. म्हणूनच त्यांचे सण एकाच दिवशी सर्व आदिवासी गावात साजरा केले जात नाहीत.

होळी हा आदिवासींचा वर्षअखेरचा सण. खरं तर उत्सवच असतो. पाच दिवस होळी साजरी केली जाते. कापणी झाल्यानंतर 'जगण्यासाठी' गेलेले आदिवासी, नोकरीनिमित्त घरापासून दूर असलेले सर्व लोक सणासाठी घरी येतात. होळीच्या दिवशी कोंबडीचे जेवण केले जाते. रात्र भर होळी पेटवून होळीत बटाटे, कांदे, कंद भाजून जागरण केले जाते. दुसऱ्या दिवशी धुळवड साजरी केली जाते. दुसऱ्या दिवसापासून पाच दिवसांपर्यंत म्हणजे रंगपंचमी पर्यंत गावातील लहान मुलांचे गट जव्हार गावात 'भायरो' घेऊन येतात. 'भायरो' म्हणजे आठ-दहा मुलांचा गट असतो. त्यांच्या तोंडाला काळे (कोळसा, काजळी वगैरे) लावलेले असते. अंगात फाटके-तुटके कपडे असतात. कानावर झेंडुची फुले किंवा निरगुडीची पाने लावलेली असतात. मुलांच्या हातात निरगुडीची फांदी असते. गटातील एखाद्या मुलाच्या हातात वाटी असते. गावात आल्यानंतर प्रत्येक घरासमोर जाऊन ही मुले पत्र्याचा डबा वाजवून भायरो-भायरो म्हणून नाचतात व पैसे घेतात.

तिसऱ्या चौथ्या दिवशी मुलांबरोबर गटात एखादा मोठा माणूस देखील असतो. त्याने घोड्याच्या आकाराची काठी अंगात लटकवलेली असते. लहान मुलांप्रमाणे मोठी माणसे 'मुसळ्या' बनून येतात. मुसळ्या कधी अंगावर काळे गोणपाट गुंडाळून, कधी पोलिस तर कधी पोस्टमन बनून घराघरातून होळीची 'पोस्त' (पैसे) मागतो. मात्र दिवसेंदिवस या भायरो व मुसळ्याची प्रथा नष्ट होत आहे.

आदिवासी समाजाने या लोप पावत चालणाऱ्या आपल्या प्रथेला जपावं-सांभाळावं. कारण तीच त्याची खरी ओळख आहे. पाचव्या दिवशी रंगपंचमी खेळून होळीचा उत्सव संपतो. जव्हार मोखाडा तालुक्यात 'बोहाडा' नावाचा जगदंबेचा उत्सव साजरा केला जातो. चैत्र -वैशाख महिन्यांमध्ये हा उत्सव साजरा होतो. हा उत्सव तीन दिवस चालतो. ह्यात वेगवेगळ्या देवाचे मुखवटे तयार करुन रंगविले जातात. नंतर ते तोंडावर बांधून वाजंत्रीच्या सहाय्याने नाचविले जातात. पहिली रात्र थाप असते. तर दुसरी रात्र लहान बोहाडा व तिसऱ्या रात्री मोठा बोहाडा असतो. चौथ्या दिवशी जगदंबा देवीला सकाळी बोकड, नारळ यांचा नैवेद्य दाखवून उत्सवाची सांगता केली जाते.

'दसरा' हाही उत्सव जव्हार तालुक्यात मोठ्या थाटामाटात व शाही पद्धतीने साजरा केला जातो. दसऱ्याच्या दिवशी संध्याकाळी रावणाच्या पुतळ्याची गावातून मिरवणूक काढण्यात येते. ही मिरवणूक शाही पद्धतीची असते. रावणाच्या पुतळ्याचे दहन व शमी पूजा गावातील नगर परिषदेच्या अध्यक्षाच्या हस्ते केली जाते. नंतर तालुक्याच्या पाड्यातून आलेल्या आदिवासी तरुण तरुणींचे गट रात्रभर तारपा व ढोल नाच सादर करतात. संपूर्ण रात्र भर तारणाच्या सुरात व घुंगरु लावलेल्या काठीच्या तालावर तारपा नाचतात. तारपा नृत्याच्या गटापेक्षा ढोल नृत्याचे गट कमी असतात. ढोल नृत्यात फक्त पुरुषच असतात. ढोलाच्या तालावर घुंगरांच्या आवाजात ढोल नाच केला जातो. ढोल नाचासाठी विशेष गाणी असतात. ती गाणी गाऊन नाच केला जातो.

आदिवासी समाज हा कलागुणांनी निपुण आहे. त्यांची घरे वारली चित्रकलेनी रंगविलेली असतात. घराच्या भिंती शेणाने सारवून त्यावर तांदळाच्या पिठाने बारीक रेषा काढून त्यांचे सण, देवता, प्राणी, पक्षी, खेळ, नृत्य इ. रोजच्या व्यवहारात जगले जाणारे चित्र रेखाटून आपले घर सजवतात. या वारली चित्रकलेला आज जगात प्रसिद्धी मिळाली आहे.

आदिवासीं मध्ये धार्मिक व सामाजिक विधीत दारुला विशेष स्थान आहे. जन्म, मृत्यू, लग्न, सण, पाहुणचार करायचा झाला की दारु पाहिजेच. दारुशिवाय त्यांचा एकही सण साजराच होऊ शकत नाही. त्यामुळे या भागात नशाबंदी कार्यक्रमाची गरज वाटते.

आदिवासी समाजाचे एक स्वभाव वैशिष्ट्य म्हणजे अंधश्रद्धाळू वृत्ती. अतिदुर्गम भागात वास्तव्य हे त्याचे कारण आहे. भूत, काळी जादू, मूठ मारणे इ. वर त्यांचा पूर्णविश्वास आहे. याच्या उपद्रवावर उपाय शोधण्यासाठी 'भगत' गावात असतात. भगताकडे दैवी शक्ती असते व त्याला गूढ गोष्टींचा

अर्थ समजतो असे ते मानतात. भगताला दारु व कोंबडा मात्र द्यावा लागतो. पिकाला नजर लागू नये म्हणून शेतात नजर भात लावला जातो. मृत आत्म्याच्या शांतीसाठी वारली समाज 'काज' हा एक विधी करतात. या विधीत भगत स्वत:चे डोके कापून ते रक्त मृत आत्म्याला बोलावून त्याच्या तोंडाने त्याच्या अपूर्ण इच्छा वदवून मग त्या इच्छा पूर्ण केल्या जातात. एखाद्याचा खून झाला असल्यास हा आत्मा खून कसा झाला ते देखील सांगतो. मात्र या प्रथेला कायद्याने बंदी आणली आहे.

अनादी काळापासून या भूमीवर राहणारे म्हणून हे आदिवासी ओळखले जातात. अतिदुर्गम भागात वास्तव्य करीत असल्यामुळे हा समाज इतर जगाशी अनभिज्ञच राहिला. आता मात्र शिक्षण व संपर्क व्यवस्थेचा विकास झाल्यामुळे या समाजाची माहिती जगापुढे येत आहे.

तसेच या समाजाच्या काही समस्याही पुढे आल्या आहेत. उदा. अतिदुर्गम भागामुळे पुरेशा सोयी सवलती व इतर आवश्यक माहिती त्यांच्यापर्यंत सहज पोहचू शकत नाहीत. शिक्षणाचे प्रमाण वाढत असले तरी तुलनेने ते कमीच आहे. आर्थिक स्वरुपाच्या समस्याही त्यांना भेडसावतात. उदा. पारंपरिक शेती पद्धतीमुळे पीक कमी येते. त्यामुळे गरिबीत जीवन जगावे लागते. त्यातच गावात रोजगार उपलब्ध नसल्यामुळे करावे लागणारे स्थलांतर व स्थलांतराबरोबर येणारे संसर्गजन्य आजार. त्यात पुरेसा आहार न मिळाल्याने येणारे कुपोषण. याचमुळे आदिवासी विभागात कुपोषणाची समस्या एक महत्त्वाची समस्या बनली आहे. त्यात व्यसनाधीनता असल्यामुळे मिळवलेला पैसा दारु साठी खर्च केला जातो. असे दारिद्र्याचे अजब चक्र आदिवासींच्या जीवनात दिसून येते. यासाठी सरकार प्रयत्नशील आहेच. मात्र लोकांमध्ये जनजागृती करुन सरकारच्या कार्यक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग वाढवणे अत्यंत गरजेचे आहे.

●●

## अस्वल

दृष्टीचा कुठला छळ
क्षितिजाला करतो पानांचा बुलंद दरवाजा ?
लावतो आरपार चिरणारा
ब्रह्मांडाच्या चिरेबंदी वाड्यावर दिवा

निबडीच्या रंगात त्याचे निधडेपण
ज्यात, वृद्धत्वाने केलंय शौर्य क्षीण
दरम्यान, अबाधित त्यांचे धैर्य प्रामाणिक

दिसतो खरा, पण येत नाही पुढ्यात
काढतो खोडी, पण प्रत्यक्षात
राहतो निसर्गागत निरागस
रणरणत्या उन्हात

अस्तित्वातल्या अनेक धारकापेक्षा वेगळ्यां
जखमांच्या खुणां, या काळादरम्यान
जेव्हा फाश्याने केलं शरीर लुळं
दु:खाने वाकवली सुखाची फांदी
त्याच्या आत्मसन्मानात तो येडं का खूळं ?

त्यानंतर अत्यंत यथावकाश
तो झाला स्वत:पासून दूर
जसे शिकारी पक्षी दृष्टीमधून
भरारी नियंत्रित करतात आपल्यातून

*एन. स्कॉट मॉमॅडे*
*मराठी अनुवाद - भुजंग मेश्राम*

# आदिवासींची सत्ता सुक्ते

– डॉ. गोविंद गारे

## आदिवासीच आदिवासींचे शत्रू

महाराष्ट्रातील आदिवासी समाजाकडे महत्त्वाची भूमिका असतानाही या समाजाकडे दुर्लक्ष होत आहे व त्याचा फक्त वापर करुन घेतला जात आहे अशी भावना आदिवासींच्या मनात निर्माण झाली आहे. आदिवासी समाजाबद्दल आत्मीयतेऐवजी ठिकठिकाणी तिरस्कार व दुस्वास केला जातो. निवडणुकीमध्ये आदिवासींविरुद्ध आदिवासी अशी लढत होते व आपसात मतभेद निर्माण केले जातात.

समाजातील राजकीय कार्यकर्त्यांनी निवडणुकीपुरते एकमेकांविरुद्ध लढावे, परंतु निवडणुकीनंतर एकत्रित राहावे. इतर समाजातील लोकही निवडणूक लढवितात, परंतु ते नंतर एकत्र होतात. आदिवासी समाजातील कार्यकर्त्यांची फक्त लढत होते, नंतर नेते एकत्र होतात अशी परिस्थिती आहे. हा समाज चुकीच्या माहितीच्या आधारावर चालल्याने मातीत चालला आहे. शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तनाची गरज होती, परंतु ते अद्याप घडू शकले नाही. समाजात अज्ञान मोठे असल्याने इतरत्र काय घडते हेही कळत नाही. त्यामुळे वैचारिक देवाणघेवाण ठेवणे गरजेचे आहे. वाईट रुढी, चालीरिती व परंपरा याला फाटा देऊन अंधश्रद्धा दूर करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावा. समाजाची उन्नती करण्यासाठी आदिवासी समाज विकास परिषद प्रयत्नशील आहे.

## या नेत्यांना आदिवासी समाजाशी काहीही देणे घेणे नाही

आदिवासींना फुटीचा शाप आहे असे म्हटले जाते, पण हे खरे नाही. समाजाची नीट बांधणी झाली नाही तर, समाज फुटणारच. आंबेडकरी समाज पहा. रिपब्लिकन पक्षाची ए-टू-झेड शकले झाली. पुन्हा जुळली. पुन्हा फुटतीलही. पण समाज समान ध्येयासाठी कधीही फुटला नाही. यापासून धडा घेतला पाहिजे.

आदिवासी समाज एकसंघ असता तर बिगर आदिवासी नेतृत्वाच्या पाठीमागे लाचार होऊन धावण्याची वेळच आली नसती. तथापि, कुणी कोणत्या पक्षात जावे अथवा तिथे काय करावे हे सांगण्याला काहीही अर्थ नसतो. जो तो त्याच्या स्वार्थासाठी सत्तेसाठी ''शॉर्टकट'' शोधतो. असे शॉर्टकट शोधणाऱ्यांना कुणाच्यातरी मर्जीवर अवलंबून राहावेच लागते. समाजाला मोठे न करता, स्वत:चा मोठेपणा मिरविणाऱ्याच्या वाट्याला हाच पर्याय शिल्लक राहतो.

आज संपूर्ण देशात एकाही राजकीय पक्षावर आदिवासी नेतृत्वाचा अंकुश नाही. एकाही पक्षाचा प्रमुख आदिवासी समाजाचा नाही. महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्षाचे नेतृत्वही आदिवासींकडे का नाही? एरव्ही समाजाची जनसंख्या मोजणाऱ्यांच्या मनगटात

समाजाला उभे करण्याचे बळ का संचारत नाही ? कारण या राजकीय नेत्यांना आदिवासी समाजाशी काहीही देणेघेणे नाही.

### आदिवासींचे शत्रू

या देशातील पुरोहित, व्यापारी, पुढारी हे आदिवासींचे क्रमांक एकचे शत्रू आहेत. मढे झाकून पोटासाठी वणवण फिरणारा आदिवासी पशुपेक्षाही घाणेरडे जीवनमान जगत आहे. शेतीचाच व्यवसाय मुख्य असल्यामुळे निसर्गाच्या लहरींवर त्यांचे अर्थकारण आहे. या देशातील जंगलाचा आणि मातीचा व्यापार करणाऱ्या ठेकेदारांना आणि व्यापाऱ्यांना जंगलातून आणि मातीतून सोने मिळते, पण या देशाचा अन्नदाता आदिवासी शेतकरी स्वत:च्या सोन्यासारख्या धनधान्याचा भाव मातीपेक्षाही कमी घेतो. त्याच्या शेतीमालाचे भाव ठरविण्याचा अधिकार त्याला नाही. आदिवासी आर्थिकदृष्ट्या पूर्ण परावलंबी आहे. बहुतांशी आदिवासी असंघटित असल्यामुळे शासनावर प्रभाव नाही. शासकीय नोकऱ्यांच्या पगारावर तिजोरी रिकामी करणारे शासन, आदिवासींच्या मदतीला यायला तयार नाही.

### आदिवासी समोरील आव्हाने गुणदोषांसह आदिवासींनी स्वीकारावीत

आदिवासी समाजाने फुले, आंबेडकर शाहूंच्या विचारांचा समाजही निर्माण केला नाही किंवा आदिवासी समाजाला एक निश्चित विचारप्रवाहातही बांधले नाही. त्यांनी फक्त सत्ता मिळविण्याचा पोटभरु नादानपणा केला. आज महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात आदिवासी समाज शासन प्रशासनाच्या बाबतीत दलितांच्या ६० वर्षे मागे चालला आहे. इंग्रजांनी प्राणीसंग्रहालयातील पशूप्रमाणे आदिवासींना जैसे थे ठेवले. गेल्या ५२ वर्षांत आपण काय केले ?

महाराष्ट्रातील दलित विद्यार्थी रस्त्यावर उतरला आहे. आदिवासी नेते रस्त्याच्या कडेला उभे राहून तमाशा पाहात आहेत. आदिवासी स्वातंत्र्यवीरांची आणि आदिवासी हुतात्म्यांची आज अवस्था आहे. महाराष्ट्रात अशा स्वातंत्र्यवीरांची कोणाला आठवण तरी झाली आहे का ? आदिवासींच्या प्रेरणापुरुषांचा असा अपमान सहन करणारे राजकीय नेते स्वत:ला आदिवासींचे नेते कसे काय म्हणवून घेतात ? आम्ही आदिवासींना ''हांडीत दाणा आणि आदिवासी उताणा'' या गुणदोषांसह स्वीकारले आहे.

### डबक्यातील बेडकाएवढं आदिवासींचे विश्व

पुराणातील गुरु वसिष्ठ मुळात एक वेश्येचा मुलगा पण गुणकर्माने ब्राह्मणपदास पोहोचला. ब्राह्मणपदाचे अधिकार प्राप्त होताच त्याने अत्यंत बुद्धीमान विश्वामित्राला झिडकारले. आजही सर्वत्र अशाच प्रवृत्तीने, ब्राह्मण्याला पोहोचलेले उच्चपदस्थ समाजाचा घात करीत आहेत. आम्ही गावाची वेस ओलांडायला तयार नाही. डबक्यातील बेडकाचे वा अंड्यातील कोंबडीचे विश्व जेवढे असते त्यापलीकडे काही आदिवासी समाजाने विश्व वाढविले नाही. त्यामुळे जुन्या बौद्धिक व आर्थिक गुलामगिरीत राहण्यातच आम्ही सुख मानतो. ह्या पार्श्वभूमीवर, आदिवासी समाजासमोर असलेली आवाहने व

आव्हाने आपण समजून घेणे आवश्यक आहे. याशिवाय समाजाची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी काळाची निकड ओळखून आपल्याला कृतीकार्यक्रमही राबवावा लागेल.

## शिक्षण, तंत्रशिक्षण आदिवासींसाठी आवश्यक

शिक्षणातून व्यक्तिगत विकास अपेक्षित आहेच, पण आपल्या विकासासोबतच त्याने समाजाच्या हिताकडे विशेष लक्ष पुरविणेही अपेक्षित आहे. मात्र शिक्षणाचा व नोकरीचा जवळचा एकमेव संबंध आदिवासी समाजाने नोकरीशी जोडल्यामुळे, समाजाचे शिक्षित तरुण बेकार होऊन चुकीच्या मार्गाने जाऊ लागले आहेत. शिक्षित व्यक्तीला स्वत:च्या व समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींचा कृतिशील अवलंब करता आला पाहिजे. त्याला चांगल्या वाईटाचा फरक समजावा.

आदिवासी समाजासाठी ''शिक्षण'' ही प्रगतीसाठीची पहिली पायरी आहे. त्यामुळे आदिवासींच्या शिक्षणसंस्थांमधून आदिवासींच्या प्रश्नांवर, अडचणींवर चर्चा व्हावी, उपाय शोधले जावेत, संस्कृतीपोषणाचे मोठे काम शिक्षणातून केले जाऊ शकते. शिक्षण म्हणजे केवळ वाचणे, बोलणे, लिहिणे व नोकरी करणे अथवा बेकार फिरणे एवढेच नव्हे. वैज्ञानिक विचारसरणी, विज्ञानाचा वापर, हित व अहित यातील फरक इत्यादी बाब शिक्षणच देऊ शकते. योग्य व अर्थपूर्ण शिक्षण आदिवासींसाठी अत्यंत आवश्यक आहे.

## आजच्या आदिवासींच्या अवनतीचे एक कारण

ज्यांना आदिवासींचा इतिहास माहीत नाही, आदिवासी वीर पुरुषांची नीट ओळख नाही; ज्यांना बिरसा मुंडा, राघुजी भांगरे, होनाजी केंगाले, बाबुराव शेडमाके, बाबुराव गोंड, भागुजी नाईक, खाज्या नाईक यांची आठवण येत नाही; ज्यांच्यातील तळमळ रक्तानसात सळसळ निर्माण करीत नाही; त्यांच्याकडून आदिवासी स्वयं शासनाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे, अशक्य आहे. या मूळ प्रेरणापुरुषांचा आम्हाला विसर पडला आहे. आजच्या आदिवासी समाजाच्या अवनतीचे हेही एक कारण आहे.

''कोणत्याही समाजाची सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक मुळं अस्मितेच्या मातीतून रसरसून फुलत नाहीत तोपर्यंत तो समाज राजकीय सत्तेमध्ये सहभागी असला तरी परावलंबीच राहतो. महाराष्ट्रात काय आणि देशात काय, स्वतंत्र भारतात आदिवासी पुढारी परावलंबीच राहिले आहेत. त्यांचे हे परावलंबन संपणारे नाही.''

## मरायला आदिवासी तर चरायला बाकी सगळे

आदिवासींच्या बँका नाहीत, शहराजवळील सर्व आदिवासींची शेतजमीन मातीमोल भावाने लुटली गेली आहे. आदिवासी शेटजीला विकलेल्या शेतावर मजूर म्हणून काम करतो. मोठी धरणे, मोठे पाटबंधारे प्रकल्प आदिवासींच्या जमिनीवर उभे राहिले आहेत. परंतु आदिवासी बागाईतदार झालेला नाही. या राज्यात आदिवासी वनमंत्री होऊ शकतो पण उद्योगपती होऊ शकत नाही. आदिवासींनी जबरदस्त लढा उभा करुन आपल्या जमिनी आणि जमिनींवरील आपले हक्क परत मिळविलेच पाहिजेत. आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी नव्या उद्योगाकडे वळलेच पाहिजेत. आदिवासींचाच कच्चा

माल, आदिवासींचाच उद्योजक व आदिवासीचाच ग्राहक असे उद्योग उभे करणे आवश्यक आहे. आदिवासींनी याची जिद्द ठेवली तर होऊ शकते. आदिवासींनी पैशाचे महत्त्व ओळखून, टाळण्यासारखा अनावश्यक खर्च टाळलाच पाहिजे व गळती असल्यास थांबवलीच पाहिजे. ''मरायला आदिवासी तर चरायला बाकी सगळं'' हे समीकरण बदलल्याशिवाय आदिवासींचे अर्थशास्त्र बदलणे अवघड आहे.

## हा लाळघोटेपणा लांछनास्पद

यशाच्या शिखरावर पोहोचलेल्या आमच्यासारख्या मूठभर माणसांनी एकत्रित येऊन प्रामाणिक प्रयत्न केल्यास समाजाची प्रगती अवघड नाही. आम्ही बरेचजण आत्मकेंद्रित झालो आहोत. आम्ही आपल्यासारखे प्रतिभावंत नसू, आपल्यासारखं विचारवंत नसू, आपल्यासारखे श्रीमंतही नसू पण आपली नाळ कुठेतरी समाईक-सामाजिक जडण-घडणीशी जुळलेली आहे याचे भान आम्हाला राहिलेले नाही. नागरी संस्कृतीतून आपण लवकर नागरी संस्कृतीत पोहोचला असाल, आम्हाला ती वाट सध्या दूर आहे. बांधवांनो, आपण जी काही मूठभर माणसं आहोत ती सुद्धा महाराष्ट्राभर विखुरलेली आहेत. त्यांना संघटीत करण्याचा प्रयत्न का होत नाही ?

आम्ही अनेकजण एकमेकांना ओळखत नाही. पण बहुतांशी सर्वच क्षेत्रांतील आदिवासी उच्चपदस्थ एकमेकांचे तोंड पाहात नाहीत. अनेक शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रांतील उच्चपदस्थांना आपल्या कार्यालयात कार्यरत असणाऱ्या समाजबांधवांना ओळख देणे अथवा चांगले वागवणे आवडत नाही. आदिवासी अधिकारी, राजकारणी, शिक्षित, अधिकारी, आपल्याच समाजबांधवांचा जाहीर अपमान करण्यात कर्तृत्व दाखवितात. आपण सर्वसमावेशक आहोत, हे दाखविण्यासाठी जाणीवपूर्वक काही विशिष्ट जातीतील अधिकारी कर्मचाऱ्यांशी व समाजातील व्यक्तींशी लाळघोटेपणा करुन लाचारी करतात.

## Pay Back to the Society

आम्ही आमच्या जीवनात नियमितपणे सत्पात्री दान करतो काय ? आम्ही आमच्या समाजातील गरजवंतांना कोणत्या तरी स्वरुपाची मदत करतो काय ? मंदिर, धर्मशाळा बांधण्यासाठी दान देणे आणि समाजबांधणीसाठी दान देणे यातला फरक आम्हाला समजतो काय ? महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव महाराज गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादी महामानवांनी शिक्षणसंस्था उघडण्याऐवजी मंदिरे बांधून पुरोहित नेमले असते तर आज आम्ही कुठे असतो. त्याचा आम्ही विचार करणे आवश्यक आहे. पण तसे प्रयत्न आदिवासी समाजात यांचे वनवासीकरण करुन सध्या चालले आहे.

आपल्या देवतांच्या जागा आता राम, हनुमान, सरस्वती, लक्ष्मी हे घेऊ लागले आहेत. आम्ही त्याचे उत्सव साजरे करु लागलो आहोत. मंदिरेच बांधायची असतील तर विद्यामंदिरे बांधू या। माऊलीने केलेल्या संस्कारांचे जतन करण्यासाठी **Pay Back to the Society** हाच मंत्र पाठ करु या.

## आदिवासी संस्कृतीच्या जागी ब्राह्मण संस्कृतीचे रोपण

आम्हाला "आदिवासी संस्कृती" माहीत आहे. पण आम्ही "ब्राह्मण संस्कृती"च्याच आधीन राहण्यात स्वारस्य ठेवतो. घरातील गायीच्या वासरावर, शेळीच्या वा कोंबडीच्या पिलावर आम्ही चांगले संस्कार करतो. पण स्वत:वर अथवा स्वत:च्या मुलावर त्याच मन, मनगट, मणका, मान, मेंदू व मस्तक सशक्त होण्यासाठी आवश्यक संस्कार करीत नाही. "बरे केले देवा आदिवासी झालो। नाही तर पोथी वाचून असतो मेलो"। ह्या संस्कृतीचा आम्हाला विसर पडला आहे व शिक्षणाचा अयोग्य संस्कार आम्ही घेतल्यामुळे आमच्यामध्ये अहंभाव निर्माण झाला आहे. गावातल्या साऱ्या बकऱ्या अथवा जनावरं एकाच कळपात राखणारा गुराखी आमचा आदर्श झाला पाहिजे.

## आजच्या युगातील बडा देव

आदिवासी पुढारी, कार्यकर्ते, पदाधिकारी, मालक, वाहक, चालक, हितचिंतक, विरोधक इत्यादी कोणत्याही श्रेणीत आपण मोडत असलो तरी आदिवासींचा प्रामाणिकपणा आपल्यात आहे काय? हे आपण तपासून घेतलेच पाहिजे. निसर्गाचं मूलभूत तत्त्व आपण समजून घेणे आवश्यक आहे. दुर्बल माणसाला, दुर्बल संस्कृतीला, दुर्बल समाजाला दुर्बल जीवनपद्धतीला कुणीही बाहेरून फार काळ वा सर्वकाळ संरक्षण देऊ शकत नाही. आदिवासींना व आदिवासींच्या जीवनपद्धतीस सशक्त व विज्ञाननिष्ठ बनवणे, हाच आदिवासींना वाचविण्याचा एकमेव उपाय आहे. त्यासाठी आजच्या युगातील बडा देव पाहिजे.

*आदिवासी अस्मितेचा जयघोष करीत*
*आपकी जयका नारा।*
*जिंदाबाद जिंदाबाद गर्जना करा.*

तुकोबा आपल्याला सांगतो, "सेत करारे फुलाचे। नाम विठोबारायाचे।। प्रेम पिकले अपार। नाही साठवावया धार।।" असा भक्तीचा मळा फुलवित जगा, ऐलतीरावरचे जगताना पैलतीराचाही विचार मनात सतत जागृत ठेवा. तुकोबांचे हे सांगणे। हाच तुकाबांचा धर्म। "बीज भाजून केली लाही। आम्हा जन्ममरण नाही।।" असे अपूर्व चिंतन देणाऱ्या तुकोबांनी मराठी भाषेला भरजरी शिरपेच चढविला म्हणून त्यांचे स्मरण अष्टौप्रहर जागते राहावे.

गुलाम महाराजांनी आपधर्माच्या चळवळीचा वन्हि पेटविला. आत्मसन्मान आणि आत्मप्रेरणांनी आदिवासी जागृत केला. आदिवासी भूमीचा बुक्का कपाळी लावून "बीज भाजून केली लाही। आम्हा जन्म मरण नाही" ही उक्ती उराशी बाळगली तर अस्मिता पल्लवीत करता येईल.

●●●

# कैफियत आदिवासी माणसाची

– सौ. कुसुम अलाम

**सा**ऱ्याच क्षेत्रात उपेक्षित राहणाऱ्या आदिवासी माणसाची ही कैफियत. अनेकांच्या अथक प्रयत्नांनी, बलिदानांनी या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. भारत स्वतंत्र झाला. या देशाने स्वातंत्र्याची सुवर्ण जयंती साजरी केली. त्यावेळची या देशाची परिस्थिती, आजची परिस्थिती, सर्वसामान्य कष्टकरी, कामकरी, या देशातील गरीब जनता, दलित आदिवासी यांची स्थिती काय आहे ?

अत्यंत दुर्गम भागात राहणारा हा आदिवासी माणूस याला जसा जंगलाच्या दाटीने सूर्यप्रकाश दिसला नाही तसाच सत्तेच्या खुर्चीवर बसलेल्या माणसाचा स्वार्थ त्याच्या भोळ्या मनाला उमगला नाही. हा माणूस आज इतरांच्या तुलनेने कोणत्या स्थानावर आहे ? याचे अवलोकन 'प्रजासत्ताक' दिनाच्या निमित्ताने करावे असे प्रामुख्याने वाटते. ज्ञानाचे डोळे नसलेला हा माणूस आजही अन्नवस्त्राशिवाय स्वाभिमानशून्य जीणे जगतो आहे, ही केवढी विटंबना त्याच्या आयुष्याची ?

या देशाला स्थिर सरकार देण्याची घोषणा करणाऱ्या सरकारला या भारतमातेच्या सुपुत्राचे विस्मरण का होते ? या माणसाला अज्ञानाच्या अंध:कारात कायम ठेवून आपला स्वार्थी हेतू साध्य करावयाचा आहे, हेच त्यावरुन सिद्ध होत नाही काय ? या माणसाला स्वातंत्र्य, प्रजासत्ताक, गणराज्य संविधान लोकशाही निवडणुका, मतदान याचा सुद्धा अर्थ कळत नाही. एवढेच नव्हे तर हा देश, ही सत्ता, हे सरकार हे सारे काय आहे याची सुद्धा त्याला जाण नाही, याचे कारण काय ? या माणसाच्या अस्मिता जागृतीसाठी कुठल्याही सत्तालोलुपांनी, या अनेक पुरस्काराचे धनी असलेल्यांनी कधीही प्रयत्न केलेला दिसत नाही. हा माणूस शहाणा झाला तर ! तर आपले कारस्थान नक्कीच उघडे पडेल ही त्यांची भीती रास्तच नाही काय ?

या अशा, स्वार्थी, लुटारुंच्या हाती- त्यांच्या कात्रीत हा भोळा माणूस सापडलेला आहे. त्याच्या आदिवासी नामाचा अनेक गैरमार्गासाठी उपयोग होताना दिसतो आहे. त्याला वनवासी करु पाहणारांची टोळी सक्रिय झालेली आहे. दुसरीकडे नक्षलवादाने सारे वातावरण भयग्रस्त आहे. हिंसाचाराने सारा आदिवासी माणूस होरपळून निघत आहे. बंदुकीच्या धाकाने आणि दंडुक्याच्या धाकाने या माणसाला नमवू पाहत आहे. आदिवासी तरुणांना अशाप्रकारे नागवले जात आहे. आदिवासी माणसाचे भविष्य असे कुस्करले जात आहे. बळी गेलेल्या तरुणांच्या विधवांची कैफियत तर काही औरच आहे. आपले कुटुंब शहरातच ठेवून नोकरीनिमित्त या भागात आलेला एक वर्ग त्यानेही येथील अज्ञानाचा भरपूर गैरफायदा घेऊन भोळ्या माणसाची फसगत केली आहे. स्त्रियांवर अत्याचार होतच आहे. येथले दारिद्र्य बरेचदा लाल हिरव्या नोटांना शरण जातानाही नाईलाजाने पाहावे लागते आहे.

पूर्वीच्या काळी हल्लेखोर लोक आदिवासी स्त्रियांना पळवून नेत असत. त्यामुळे आपली स्त्री

ओळखू यावी म्हणून स्त्रिया अंगांगावर गोंदवून घेत. ती पूर्वीची असुरक्षित स्त्री आणि नक्षलवाद्यांच्या बंदुकीच्या धाकावर पळवून नेऊन वापरली जाणारी आजची स्त्री, खरंच आदिवासी स्त्री सुरक्षित आहे ? जागतिक स्तरावर स्त्रियांचे प्रश्न मांडणाऱ्या स्त्री मुक्ती चळवळी आणि ते कार्य करणारे कार्यकर्ते यांनी या स्त्रियांचे प्रश्न जगासमोर मांडले ? अल्पवयीन आदिवासी मुलींचे बेपत्ता होणे कुणाच्या हृदयाला घाव घालतात ? त्यांचे दु:ख, त्यांच्या आप्त स्वकियांची दु:खं कुणाच्या मनाचा ठाव घेतात ? कुणाचे ऊर फोडतात ?

एअर कंडीशनमध्ये राहून मनोरंजनाच्या दुनियेत रमणारे साहित्यिक जेव्हा आदिवासी माणसाचे दु:ख, त्यांच्या व्यथा वेदना रंगवतात, खरंच आदिम वेदनेशी ते प्रामाणिक असतात ? खरेतर ते आदिवासी साहित्याचा अभ्यास करुन आदिम दु:खाचे संदर्भ शोधतात.

भामरागडच्या अलिकडे असलेल्या 'हेमलकसा' येथील लोकबिरादरी केंद्र अशा लोकांचे पर्यटन केंद्र होऊन बसले आहे. आदिवासी माणसाला त्यांनी सर्कशीतील जोकर बनवून टाकले आहे. आदिवासींचे 'रेला' हे त्यांचे मनोरंजन असते तर फोटोग्राफी हा फावल्या वेळचा छंद होऊन बसतो. या माणसाची झोपडी त्यांचे कुतुहल जागे करते.

आदिवासी माणसाची 'गोटूल' वर भारीच श्रद्धादिवसभर श्रमलेले, थकलेले शरीर अपार कष्ट करणारे जीव पोटात चारा टाकल्यानंतर या 'गोटूल' मध्ये येतात. येथे तरुण तरुणी, वृद्ध स्त्री पुरुष सारेच सहभागी होतात. हा माणूस कुणाचेही वाईट न चिंतता, चहाड्या, चुगल्या न करता एकमेकांच्या सुखदु:खाच्या, भावी जीवनाच्या चर्चा करण्यात रमतो. अनेक अडचणींवर सामूहिक विचार होतो. मार्ग सापडतात. नैतिक मूल्यांचे शिक्षण या ठिकाणी दिले जाते. सारे व्यवहार संस्कृतीची मूल्ये जोपासून केले जातात. परंतु एअरकंडीशनमध्ये बसून अप-टू-डेट राहणारा माणूस या गोटूलला व्यभिचाराचं रूप देऊ पाहतो आहे. आदिवासी संस्कृतीची चेष्टा करतो आहे.

आदिवासी शिक्षणाबाबत तर सारा सावळा गोंधळ. अनुदानित शाळेची स्थिती तर अवर्णनीयच. वेगळी बोलीभाषा, नागरी वातावरणापासून अनभिज्ञ अशा विद्यार्थ्यांस शिक्षण म्हणजे काय याची काय कल्पना असेल ? मग तो शिक्षणाबाबत उदास राहणार नाही तर काय ? अपयशी विद्यार्थ्यांची फौजची निर्माण होताना दिसते, मग स्पर्धात्मक दृष्टिकोन तर त्यांच्या कित्येक योजने लांबच. इथूनच त्याच्या अध:पतनाची सुरुवात होते. शिक्षकवृंद परीक्षा हॉलमध्ये ढील देतात आणि बोगस निकाल लागतात. संपूर्ण पिढी उद्ध्वस्त होते.

साऱ्या समस्यांवर इलाज आहे, पण त्यासाठी सहकार्याची गरज आहे. आदिवासी विकास योजना राबवणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांची गरज आहे. सेवाभावी नि:स्वार्थी नेतृत्वाची त्याला गरज आहे. तरच त्याचा उद्याचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. अन्यथा डोंगरदऱ्या, कड्याकपारीतील हा माणूस असाच अंध:कारात चाचपडत राहील आणि या माणसाला 'बघायला' ते ताफेच्या ताफे घेऊन येतील, म्हणतील,

'अरे ! हा बघा आदिवासी !!

# आदिवासींच्या शिक्षणातील मुख्य समस्या

-प्रा. अरविंद सी. राणे

**को**णत्याही समाजाचा सुधारणेचा पाया शिक्षण हा आहे. मागासलेल्या समाजात शिक्षण नसेल तर आर्थिक किंवा सामाजिक प्रगतीसाठी कितीही प्रयत्न केले तरी ते निष्फळ ठरतात. ज्या समाजाची सुधारणा करावयाची त्या समाजाले केल्या जोपर्यंत जाणा-या सुधारणेचे महत्त्वच पटत नाही तो पर्यन्त त्या सुधारणा बाहेरुन लादल्या सारख्या होतात व अल्पजीवी ठरतात. सुधारणेच्या नवकल्पनांनी ज्यांची प्रगती करावयाची त्यांच्या मनाची पकड घेतली की त्या कल्पना शक्तीशाली बनतात. आणि मग ख-या अर्थाने प्रगतीला सुरुवात होते. अशा प्रकारे सुरु झालेल्या प्रगतीचा प्रवाह मग कोणी अडवू शकत नाही. ही गोष्ट फक्त शिक्षणानेच साध्य होण्यासारखी आहे. पण हे सर्व व्हावयाचे असेल तर त्या समाजात शिक्षणाची गोडी निर्माण व्हावयास पाहिजे, आणि सर्वात कठीण काम कोणते असेल तर मागासलेल्या आदिवासी समाजात शिक्षणाची आवड व आस्था निर्माण करणे हे होय.

## १) शिक्षणाला गौण स्थान

आदिवासी मुलांना घरातील कामात सहभागी व्हावे लागते. वस्त्या व पाड्यांवर कुठे घरांना दारे आहेत, कुठे नाहीत. घरात काही विशेष सामान नसले तरी लहान मुले, कोंबड्या, भांडीकुंडी आणि पाण्याची मडकी - गाडगी असतात हे सांभाळण्यासाठी छोट्या मुलांना घरी राहावे लागते. आई-वडिलांना वर्षभर शेतीचे किंवा मजुरीचे काम मिळतेच असे नाही. पण कधी मजुरीसाठी तर कधी जंगलातून सरपण आणणे, झोपडीसाठी पाने, गवत, लाकडे वगैरे गोळा करणे इत्यादी घराची कामे करण्यासाठी म्हणून नेहमीच बाहेर राहावे लागते. मजुरीच्या कामा शिवाय जंगलातील लाकडे, पाने, महू- फुले वगैरे वस्तू आणून विकणे, जंगलातील लाकूड बांबूची ने-आण करणे वगैरे कामे काही लोकांना करावी लागतात.

अशा अनेक कारणांनी आई-वडील बाहेर असतात. अशावेळी घरातील तान्हया बाळाची आई ही मोठी भावंडे, साधारणतः ६-७ वर्षाची. त्यापेक्षा मोठी असणारी मुले गुरे चारण्यासाठी जातात. स्वत:ची गुरे नसली तर जमिनदारांची गुरे चारायला जातात. सालदार म्हणूनही असतात. दिवसभर गुरे चारावयाची व स्वच्छंदी व मोकळ्या वातावरणात फिरायचे. एका ठिकाणी कुठे थांबावे हे त्यांच्या अंगवळणी पडत नाही. त्यांना ते आवडत नाही. आठ ते दहा वर्षाची होतात न होतात , तीच मुले आई-वडिलांना मदत करतात. अल्पवयात ही मुले घरातील उचलता येईल ती जबाबदारी उचलतात. पण त्यामुळे शिक्षणापासून कायमची वंचित राहतात. कमीत कमी शालेय शिक्षणाचे वय असणा-या मुलांना तरी शिक्षण दिले पाहिजे.

## २) शिक्षणाविषयी नावड/सुप्त गुणांना वाव नाही

आदिवासी मुलांच्या स्वभावाचे निरीक्षण केले असता ही मुले भोळी -भाबडी प्रेमळ चपळ, काटक असतात. त्यांना ना ऊन - पावसाची भिती की जंगली जनावरांची. दिवसभर गाई-गुरांच्या मागे रानात भटकतात. वृत्ती भटकी, सदा भक्ष्यांच्या शोधात फिरावयाची. झाडांची कंदमुळे, कै-या, जांभळे, आंबे, चिंचा, बोरे इत्यादी फळे आणि वडाच्या कोवळया कळ्या, उंबरे खायला त्यांना आवडते. पोटात भूक मोठी, मग शिकण्याकडे त्यांचे लक्ष कसे लागणार. मुलांचा स्वभाव मोठा खोडकर असतो. थोड्याशा कारणाने ती खो-खो हसून पुरेवाट करतात. पण तितकीच लाजरी, अबोल निसर्गाची बाळे ती, निसर्गासंबंधी विचारले तर पटकन सांगतात. पण बाहेरचे इतर लक्षात राहत नाही. या मुलांच्या भोवती आधुनिक वातावरण अतिशय कमी. कित्येकांनी अद्याप रेल्वे पाहिलेली नाही.

अतिदुर्गम भागातील काही मुलांना ७वी ८वी होई पर्यन्त जवळच्या बाजारपेठेपर्यंत आणले जात नाही: तर रेल्वे दूरच. आदिवासी मुले बुध्दीने मुळीच कमी नाहीत. पण त्यांच्या जिज्ञासूपणाला चालना देऊन त्यांच्यात शिक्षणाविषयी आवड निर्माण केली पाहिजे.

## ३) शिक्षकाची उदासीनता

शिक्षण संपादनात यश मिळवण्यासाठी पालकाच्या वृत्तीइतकीच महत्त्वाची बाब शिक्षकाची असते. निरागस, कोवळ्या बालमनावर संस्कार करणे अवघड काम असते. ही कला अवगत होण्यासाठी शिक्षकाला त्याची आवड असणे जरुरीचे असते. आदिवासी विभागात काम करणा-या शिक्षकाच्या संदर्भात तर हे अधिक महत्त्वाचे आहे: पण आज असे दिसत नाही. प्रशिक्षित, ध्येयवादी तसेच मानवतावादी दृष्टी असलेले शिक्षक आदिवासी भागात नेमण्याऐवजी बिगर प्रशिक्षित नवख्या किंवा प्रकरणी शैक्षणिक कार्यात सर्वच बाजूंनी मर्यादा पडतात. आधीच शिक्षणाबद्दल उदासीनता असणा-या आदिवासीं मध्ये निरुत्साही शिक्षक गेला म्हणजे त्या शिक्षकाची व शाळेतील विद्यार्थ्यांची काय अवस्था होत असेल याची कल्पनाच न केलेली बरी.

## ४) शिक्षणातील गळती आणि स्थगिती

आदिवासी विद्यार्थी निरनिराळ्या कारणांमुळे फार मोठ्या प्रमाणावर प्राथमिक स्तरावर शाळा सोडून जातात व त्यामुळे फारच कमी मुले व मुली माध्यमिक शिक्षणाकडे वळतात. गळती आणि गैरहजेरीची कारणे सामान्यत: आर्थिक, सामाजिक, प्राकृतिक व शासकीय आहेत. आदिवासी भागातील मुले ही केवळ त्यांच्या परिस्थितीमुळे संपूर्ण चार वर्षे शाळेत राहू शकत नाहीत. त्यांच्या मोफत शिक्षणाची सोय केली तरी या मुलांना अन्न, वस्त्र पुरविण्याची जबाबदारी पालक सांभाळू शकत नाहीत. शिवाय खेड्यातील पालक इतके गरीब व दरिद्री असतात की, त्यांना त्यांच्या संसाराचा गाडा चालविण्यात मुलांच्या श्रमाची अनेक त-हेने गरज लागते.

थोडक्यात जो पर्यंत या देशातील बहुसंख्य पालक निरक्षर आहेत, शिक्षणाशी त्यांचा संबंध येत नाही तो पर्यंत ही परिस्थिती चालू राहण्याची भीती आहे. काही वळेला शासकीय अव्यवस्थांमुळे देखील शाळेतील मुलांची गळती वाढते. सक्तीच्या शिक्षणाचा कायदा असला तरी त्याची अंमलबजावणी होत नाही. बदलून गेलेल्या शिक्षकांच्या जागेवर नवीन शिक्षक वेळेवर येत नाहीत व आले तरी नियमित उपस्थित राहात नाही. सुट्या स्थानिक जीवनाशी सुसंगत नसतात. अभ्यासक्रम मुलांना राबविण्यासारखा नसतो. शाळेकडे सातत्य नसते. ही परिस्थिती सुधारुन पुढे जाणे हा गळतीसाठी एक मार्ग होऊ शकतो. गळती प्रमाणेच स्थगितीमुळे देखील प्राथमिक शिक्षणाच्या वाटचालीत खंड पडू शकतो. मुलांची अनियमित उपस्थिती, शिक्षकाची अकार्यक्षमता, अध्यापन न पेलणारा अभ्यासक्रम ही स्थगितेची/गळतीची मूळ कारणे दूर करण्याचे प्रामाणिक प्रयत्न झाले पाहिजेत.

## ५) शिक्षण देण्याची पध्दत व पुस्तके

आदिवासींच्या शिक्षणाच्या दृष्टीने प्रचलित शिक्षण पध्दत व पुस्तके या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. बाल वर्गापासून शिकविण्याची पध्दत सध्या चालू आहे. आदिवासी समाजाची रचना, चालीरीती व परिस्थिती भिन्न असल्यामुळे तिच्याशी सुसंगत अशी शिक्षण पध्दती स्वीकारणे योग्य होईल. आदिवासी मुलांचे मन शाळेत कसे रमेल, त्यांच्यात शिक्षणाची गोडी कशी निर्माण होईल, त्यांच्या परिस्थितीला वातावरण अनुरुप कसे होईल अशा प्रकारच्या शिक्षण पध्दतीची जरुरी आहे. जी गोष्ट शिक्षण पध्दतीला लागू आहे, तीच गोष्ट शिक्षणाचे माध्यम व पाठ्यपुस्तके तयार करताना विचारात घेतली पाहिजे. महाराष्ट्रातील आदिवासींच्या भाषा मराठी वळणाच्या आहेत. परंतु गोंडी, भिलोरी, तडवी, पावरा यांच्या भाषांचा थोडा स्वतंत्र विचार करावा लागेल.

आदिवासी मुलांच्या शिक्षणाला ज्या वेळेस सुरुवात होते त्या वेळेस या विविधतेचा विचार करुन त्यांना शिकविण्याची नवी पध्दत अंगीकारली पाहिजे. त्यासाठी खास प्रकारचे प्रशिक्षणही शिक्षकांना दिले पाहिजे. त्या जमातीतील शिक्षक तयार केले पाहिजेत. विद्यार्थ्यांचे मन शाळेत गुंतवून राहण्यासाठी पहिली दोन वर्षे तरी ह्या सर्व गोष्टींचा विचार करुन शाळा चालविण्यात आल्या तर थोडे फार यश पदरात पडेल. प्रचलित शिक्षण पध्दतीने शिकलेल्या आदिवासी समाजाबद्दल दुराव्याची भावना निर्माण होण्याचा धोका आहे. तोही नव्या शिक्षणाव्दारे टाळता आला पाहिजे. शिवाय आदिवासींच्या शैक्षणिक विकास खरोखरच साधायचा असेल तर त्यासाठी उत्तम उपाय म्हणजे निवासी शाळा होय.

निवासी शाळेच्या आधारे मुलांवर चांगले संस्कार करता येतात व त्यांना हवे त्या प्रकारे अध्ययन करता येते. त्यामुळे एकंदरीत शैक्षणिक प्रगती झटपट होते. एक शिक्षकी शाळा काढणे म्हणजे केवळ शाळांची संख्यात्मक प्रगती वाढवणे होय. मात्र गुणात्मक प्रगती साध्य करण्यासाठी

शिक्षकाची कर्तव्यनिष्ठा, जिद्द, कामाची आवड असल्याशिवाय एक शिक्षकी शाळा चालविणे कठीण आहे.

### ६) शिक्षक निवासस्थानाचा अभाव

आदिवासी भागात राहणा-या शिक्षकांसाठी निवासस्थानाची सोय बहुतेक ठिकाणी नाही. त्यामुळे शिक्षकांना गावातील एखादे प्रतिष्ठित नागरीक, कारभारी, सरपंच यांचेकडे सुविधा उपलब्ध झाली तर होते. अन्यथा शिक्षकाला एखाद्या ग्रामीण कुटुंबाबरोबर थांबावे लागते. परंतु परिवारासह ग्रामीण भागात राहणे शक्य होत नाही. निवासस्थानाची सोय झाल्यास निश्चितच फरक पडेल.

### ७) किमान सुविधांचा अभाव

आदिवासी भागातील वस्ती ही डोंगर दऱ्या-खो-यातून विखुरलेली आहे. एखाद्या किमान जीवनावश्यक गरजा भागवणा-या बाजारपेठेपासून सुमारे ३० ते ४० किंवा ५० ते ६० किलोमीटर अंतरावर वस्ती पाड्या-पाड्याने विखुरलेली असते. शिक्षकाला एवढे अंतर पायी प्रवास करावा लागतो. रस्त्यांची सोय नाही. जीवनावश्यक सर्व वस्तू त्याला डोक्यावर धरुन शाळेच्या गावापर्यंत न्याव्या लागतात. परिणामत: शिक्षक कितीही उत्साहाने, जिद्दीने निघाला तरी त्या शाळेवर पोहचेपर्यंत सर्व उत्साह मावळतो. परिणामत: दुर्गम भागातील शिक्षणावर विपरीत परिणाम दिसून येतो.

●●●

## महाराणी दुर्गावती

कमलनयनी तू कोमलांगी
भासे सूर्यपाकळी तू तेजाची
तुझ्या असिम तेजाने
मुगलांची झोप उडाली

वैधव्य आले तरी
तू जराही खचली नाही
त्या तुझ्याच सामर्थ्याची
गढमंडला देई ग्वाही

ती तुझी अपूर्व धडाडी
नजरेत मोगलांच्या भरली
जणू वेदनेची धडकी
उरात त्यांच्या भरली

तू मर्दानी मंडल्याची
तू तेजाची चकाकी
तुझ्या विराट आयुष्याला
किनार तुझ्या शौर्याची

मज शपथ तव आयुष्याची
त्या अद्‌भूत वीर बलिदानाची
तुझे आयुष्य झुंजार वादळी
मीही घेणार जात वाऱ्याची

तुझे समर्पित आयुष्य
घेणार आहे मी आज
तुझ्या अतुल पराक्रमाला
माझे लाख लाख प्रणाम ॥

*- श्रीमती कुसुम अलाम, गडचिरोली*

# बारागाव डांगची थोडक्यात माहिती

– रतन पवार

सन १९४७ साली आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळाले, त्याकाळी म्हणजे १९४६ साली इंग्रज राजवटीत ही बारा गावे पूर्वी मूल्हेर येथील संत बाबा यांना इंग्रज सरकारने इनाम (जहागीर) म्हणून दिली होती. ती गावे पुढील प्रमाणे १) चींचला २) हाडकाई चोंड ३) पिंपळ सोंड ४) रहात विहार ५) गुही जामून पाडा ६) सोनगीर ७) करजूल (क) ८) गारमाळी ९) मालगव्हाण १०) लाडगाव ११) केळीपाडा १२) करंजाळी अशी एकूण बारागाव ही संत मूल्हेरचे बाबा यांची जहागीरी म्हणून होती.

मूल्हेर हे सटाणा तालुक्यात असून त्या गावी बाबाचा राजवाडा म्हणून प्रसिध्द आहे त्याचप्रमाणे त्याठिकाणी उधव बाबाचे एक मंदीर बांधले आहे. त्या मंदीरात उधव महाराजांची मशीद असून त्या मंदीराचे दोन्ही बाजूस संत लोकांनी येऊन तपश्चर्या करणेसाठी समाधी घेणे कामी चाळ तयार केल्या असून आजही साधू - संत तेथे येत असतात.

वर दर्शविलेली गावे, या गावचा शेतसारा जमा करुन तो जमलेला पैसा त्या संत बाबाकडे गावचा कोतवाल नेऊन देत होता. त्याकाळी सर्व पायी प्रवास असावयाचा. प्रत्येक गावचा पो. पाटलाने शेतसारा जमा करुन कोतवाल (नाईक) पायी कळवणला तहसिल कचेरीत जाऊन तिजोरीत भरणा करुन येत होता. त्यावेळी त्या कोतवालास जाण्यास तीन दिवस जायला व तीन दिवस येण्यास लागले होते. मात्र जंगलाचा व्यवहार ब्रिटीश राज्याकडे असावयाचा. जंगलाचे उत्पन्न हेगुजराथ राज्यात व्यवहार चालत असे. प्रत्येक गावाचा पोलीस पाटील हाच न्याय देत होता. पोलीस पाटलाकडे वेठ बिगार करावी लागत होती.

पावसाळी उन्हाळी शेतीच्या कामासाठी प्रत्येक घरचा मनुष्य त्या पाटकाकडे शेतीच्या कामाला जात असे. त्याकाळी जबरी तक्रारी असतील तर पोलीस पाटलाने शिक्षण घेतलेल्या इसमास बोलवून तक्रार लिहून घ्यायची व त्या कागदाची घडी करुन तो बांबूच्या काठीला बाधावयाचा व त्या काठीला कोंबड्याचे पिस बाधून त्यास पिसमाळ्या कागद म्हणून कळवणला कोतवाल घेऊन पाठवायचा. ह्या बारागावलगत सुरगाणे राज्यातले लोकसुध्दा जंगलात आले की त्याला बेदम मारझोड करुन पोलीस पाटलाकडे घेऊन त्यास शिक्षा दंड देऊन सोडून देत असे.

बारागाव डांगचा पूर्वी हुकूमशाही कारभार चालत असे. त्याचप्रमाणे सुरगाण्याचे राजे यशवंतराव प्रतापराव हे राज्य करीत होते. तो काळ १९३२ सालचा होता. यशवंतराव हे राजे मेल्यावर धैर्यशीलराव हे राज्य सांभाळत होते.

जेव्हा १९४७ साली आपल्या भारताला स्वतंत्र मिळाले त्यावेळी ब्रिटीश (इंग्रज) राज्य संपले, पण हुकूमशाही वेठ बिगारी व ह्या बारागावचा नियम चालूच होता; परंतु सन १९४८ सालात लोकप्रतिनिधीने गावोगावी पायी फिरुन लोक जागृतीचे कार्य सुरु केले. दादासाहेब बिडकर यांनी येऊन लोकांना जागृत करण्यासाठी सुरगाणे राज्यातील जनतेसमोर भाषणे केली.

'आता आपण स्वतंत्र झालो. सुरगाण्याचे राजे गेले. कोणाची वेठ बिगार करायाची नाही व कोणाला भ्यायचे नाही; परंतु या बारागावचा कारभार १९४८ ते १९५२ पर्यंत हुकुमशाही व वेठबिगार पध्दतीने चालूच होता. दादासाहेब बिडकरांनी १९३३ साली मुल्हेर येथे मुलांचे वसतीगृह चालू केले व १९५३ साली सूरगाणे भागात प्राथमिक शाळा सुरु केल्या. उंबरठाण येथे १२० मुलांचे आश्रम सुरु केले. ते आश्रम चालविण्यासाठी दादासाहेब बिडकर यांनी नारायण सीताराम पाटील यांची नेमणूक केली.

नारायण पाटलाने बारागांव डांग व सुरगाणे राज्यातील काही गांवामध्ये फिरुन लोक जागृती करुन त्यांनी बारागाव डांगचे कार्यकर्ते धवळू साहरे रा. गुही व सामजीभाई साहरे रा. रघत विहर, गंगाजीभाई हाडकायचोंड करंजूलचे पोलिस पाटील चौधरी तसेच सुरगाणा तालुक्यातील नारायण पाटलाबरोबर कार्य करणारा रतन लक्ष्मण पवार देशमुख रा. उंबरठाण व म्हैसखडक येथील देवाजी तुळजी चौधरी नवसू बंडू यांना एकत्र जमवून बारागाव डांगचा हुकूमशाही कायदा बंद केला. १९५४ सालापासून या बारागावचा व्यवहार आता शांतपणे आहे, म्हणून हा 'बारागाव डांग' नाव ठेवले होते.

●●●

## टिवन लेकवर सूर्यास्त

*पाणी विंचरतोय बगळा*
*पाण्याच्या जाळ्यावर त्याची दृष्टी*
*जी दर्पण निर्मित*

*बगळा आहे संवाहक*
*नरकुळाच्या गाण्याचा*
*पाय, चोच नी पंख*
*सर्व आहेत वाद्यवृंद*
*सुर्यास्ताच्या समारोहाचे*

*पहाडापर्यंत एक दूरगत संदेश*
*आताही आम्ही ठेवतो*
*केवळ जवळच्या वस्तूंवर भिस्त*
*आमचे हात आताही धुंडाळतात*
*मागचा उजेड, जेंव्हा*
*आम्ही टाकतो बासरीची नाव*
*आणि उसळते मासळी*
*पाण्याखालून उगवणाऱ्या चंद्राच्या*
*जाळ्यात*

*अनिता एन्ड्रेज*
*मराठी अनुवाद - भुजंग मेश्राम*

# आधी केलेचि पाहिजे

– भारती मेहता

**म**हाडपासून १२/१३ किलोमीटरवर एक छोटेसे गाव आहे. त्याचे नाव टोळ. हल्ली ग्रामीण भागातही महिलामंडळे, तरुणमंडळे स्थापन होतात. विविध स्वयंसेवी संस्थांतर्फे सुधारणेचे प्रयत्न होत असतात. तसेच या गावातही एका महिला मंडळाची स्थापना झाली. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागाचे एक महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे त्यांच्यातील एकजूट ! म्हणून अजूनही त्यांच्यात काही कामे गावकीची म्हणून करायची म्हटलं की घरातल्या प्रत्येकाचा सहभाग असतोच. तसेच महिलमंडळाची सभा घ्यायची म्हटलं की एकही महिला गैरहजर नसते. इतर खेडेगावाप्रमाणे याही गावात पुरुषांचे दारु पिण्याचे प्रमाण वाढले होते. गावात दारुची दुकानेच मुळी दहा होती. त्यावरुन हा धंदा किती जोरात सुरु होता ते लक्षात येईल.

सर्व महिला हे दारु पिणे, आरडाओरडा, शिवीगाळ, मारपीट या गोष्टींना कंटाळल्या होत्या. महिलामंडळात या गोष्टीला आळा कसा घालावा याचा विचार सुरू झाला. एकमताने असे ठरले की आपण सर्व महिला मिळून प्रत्येक दुकानावर मोर्चा न्यायचा आणि त्यांना दुकान कायमचे बंद करण्याविषयी विनंती करायची. उपयोग होईल की नाही याची शंका मनात होतीच. 'पण प्रयत्न तर करुन पाहायला काय हरकत आहे?' असा विचार करुन त्या कामाला लागल्या.

ग्रामीण भागातील मजा म्हणजे महिलामंडळाच्या कामाला पुरुषवर्गही मदतीचा हात पुढे करतो. या मंडळाची अध्यक्षा जी होती तिच्या नवऱ्यालाच दारु पिण्याचे व्यसन होते. पण बायको महिला मंडळाची अध्यक्षा म्हणजे मोठी मानाची जागा, असे तिच्या नवऱ्याला वाटायचे. त्यामुळे त्याच्या मनात आले की माझी बायको अध्यक्षा आणि मी दारु पितो म्हणजे बाकीच्या बायका तिला नावे ठेवतील.

'घरचे खरकटे आधी निस्तर मग गावाकडे बघ' असे बोलल्यावाचून राहणार नाहीत, असा विचार करुन त्याने दारु सोडण्याचा निश्चय केला. चला, शुभारंभ तर चांगला झाला. मग उत्साहाने प्रत्येक दुकानदारांना विनंती करण्यात आली. विशेष म्हणजे नऊ दुकानदारांनी यात मदत केली, पण एक दुकानदार काही दाद देईना. आधी मिळालेल्या यशाने बायकांचा उत्साहही व्दिगुणीत झाला होता. त्यांनी चौकशी वगैरे करुन त्या दुकानदारावर केस घातली.

हा खटला महाडच्या कोर्टात चालला. न्यायाधीश महाशयांना या महिलांचे कौतुक वाटले. त्यांनी लवकरात लवकर तो खटला निकाली काढला. अर्थात बायकांच्या प्रयत्नांना यश येऊन गावातील दहाही दारुची दुकाने बंद

( पृष्ठ ४० वर पहा)

# "दिसतं तसं नसतं म्हणून लिहावसं वाटलं"

प्रा. बी.जे. शास्त्री

**मा**णसाची भ्रमंती अवस्था संपुष्टात आल्यानंतर माणूस कोठे ना कोठे तरी स्थिर होऊ लागला. आद्य पाषाणयुगापासून ते धातू युगापर्यंतचा मानवाचा प्रवास हेच दर्शवतो की, जगाच्या कोणत्या ना कोणत्या तरी भूभागावर मानव आपले पाय रोवून स्थिरावू लागला. पण काही भूमिपुत्रांनी लोकवस्तीपासून दूर व दुर्गम असलेल्या डोंगर-कपा-यात, नद्या-नाल्यात आपला तळ ठोकला. 'धरतीची लेकरे' म्हणून ज्यांचा सर्वार्थाने उल्लेख करता येईल, अशा 'आदिवासी' समाजाची दुनियाही वेगळी आहे. अशा 'आदिवासी' बाबत अनेक समज-गैरसमज असले तरी हा समाज इतर समाजापासून अलग वाटणारा व फळाफुलांच्या, झाड-पाल्याच्या चवीने समाधान मानणारा, पाखरासारखा स्वच्छंदी जीवन जगणा-या या समाजाबद्दल लिहावे ते कमीच आहे, असे मला तरी वाटते.

आदिम समाजाचा सर्वार्थाने विकास होण्याच्या दृष्टीने प्रत्येक राजकीय पुढा-याने आश्वासने दिलीत/देत आहेत. काही अंशी बदल झाला असला तरी त्यात आमूलाग्र बदल होण्यासाठी 'विकासाची क्रांती' घडवून आणली पाहिजे. अर्थात याठिकाणी खास करुन उल्लेख करावासा वाटतो की, विकास म्हणजे धन-दौलत असणे, सर्वसुख-सोयींनीयुक्त घर असणे, कपडे-लत्ते बदलणे, पैसा हाती असणे असे नव्हे; तर शारीरिक, बौध्दिकदृष्ट्या परिपूर्ण म्हणजे विकास होय. त्यासाठी शैक्षणिकदृष्ट्या क्रांतीकारक बदल घडवून आणणे अत्यंत गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्यांतर्गत 'आदिवासी विकास आयुक्तालय संचलित' शासकीय आश्रम शाळा या योजनेअंतर्गत आदिवासींच्या विकासासाठी 'शिक्षणाची ज्ञानगंगा' आदिवासींच्या मुलामुलींना उपलब्ध करुन देण्याचा अत्यंत स्तुत्य उपक्रम ग्रामीण भागात राबविला जात आहे. त्याचा निश्चितच परिणाम झाला आहे. म्हणूनच आज अनेक आदिवासी युवक-युवती उच्च शिक्षित झाल्याचे दिसते. त्यामुळे येणा-या नवीन पिढ्यांचे कल्याण होत आहे. यात तीळमात्र शंका नाही.

सध्या आश्रम शाळेमार्फतच स्वतंत्र 'प्रकल्पस्तरिय' खेळांच्या स्पर्धा घेतल्या जातात. यामार्फत आदिवासी मुला-मुलींच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव तर मिळतोच; परंतु त्याचबरोबर स्पर्धात्मक आव्हानांना सामोरे जाण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण होते.

१९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यात एकूण लोकसंख्येपैकी ७३.२० लाख आदिवासींची संख्या होती, ती राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी फक्त ९.३% इतकी आहे. आदिम जमातीच्या विकासाच्या दृष्टीने प्रत्येकजण प्रयत्नशील असल्याचे भासवतात आणि त्यादृष्टीने

भाषणबाजी-स्टेजबाजी करताना आपण नेहमी पाहतो. (राजकीयनेते, समाजसेवक, सामाजिक संस्था) खरोखरच आदिवासींचा विकास होण्यासाठी ५३ वर्षांची गरज होती का? असा प्रश्न आल्याशिवाय राहात नाही. अर्थात याबाबतीत एखाद्या वाचकाने/अभ्यासकाने संशोधन केले तर त्याला सुध्दा प्रश्न पडेल की, आदिकालापासून या भूतलावर वास्तव्यास असलेल्या या समाजाच्या विकासाला कुठेतरी 'खिंडार' तर पडले नाही ना? असा प्रश्न पडल्याशिवाय राहणार नाही. कारण गेल्या ५३ वर्षात (स्वातंत्र्य मिळाल्यापासून) आमचा आदिवासी 'शिक्षणाच्या' दृष्टीने अजूनही अविकसित आहे. अक्राणी (धडगाव) सारख्या तालुक्यात १२.७९% जनता साक्षर आहे. (१९९१ नुसार) त्यात स्त्रियांचे प्रमाण फक्त ६.६८% आहे.

मला असे वाटायला लागले की, आदिवासींचे कल्याण-उत्थान कोणतेही एकटे सरकार किंवा राजकीय पक्ष पूर्णपणे करु शकत नाही. तेव्हा आता समाजानेच (आदिवासींने) समाजासाठी उभे राहिले पाहिजे. परंतु हे केव्हा शक्य होणार, जेव्हा आमचा आदिवासी बांधव जागृत होईल अथवा अन्यायाविरुध्द पेटून उठेल त्यासाठी वैचारीक क्रांती होऊन आदिवासी युवक-युवती संपूर्णतः संघटीत होणे अत्यंत गरजेचे आहे.

राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात काही प्रमाणात यशस्वी होऊन वावरु लागलो म्हणजे आपल्यातील 'आत्मसन्मान' जागृत झाला असे नाही. याठिकाणी खास करुन उल्लेख करावासा वाटतो की, जी काही मुठभर मंडळी उच्चशिक्षित, वरच्या पदावर कार्यरत आहे अशी काही आदिवासी मंडळी आपली जात सुध्दा दाखवायला घाबरतात. त्यांना जात दाखवायला-बोलायला लाज वाटते असे दिसते. परंतु या महाशयांना हे समजत नाही की, ज्या समाजात वावरलो, मोठे झालो, समाजामुळे त्या पदापर्यंत जाऊन पोहोचलो त्या समाजाला विसरणे अथवा ओळख न देणे योग्य नाही.

कदाचित आपण वावरत (कार्यरत) असलेल्या ठिकाणी समाजाची ओळख दिली तर आपल्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल असे त्यांना वाटत असावे. अशा मंडळींना हे कळत नाही की, त्या समाजाचे आपल्यावर ऋण/उपकार आहेत, त्याची परतफेड म्हणून फूल ना त फुलाची पाकळी देऊन सामाजिक आत्मसन्मान वाढविला पाहिजे. परंतु परिस्थिती उलटी दिसते. अर्थात या माझ्या मताशी सर्व वाचक-विचारवंत-अभ्यासक सहमत असतीलच असे नाही.

वर म्हटल्याप्रमाणेच स्वच्छंदी जीवन जगणा-या आणि रुढी परंपरांना पालीसारखा चिकटून राहणा-या आमच्या या आदिवासी बांधवांची शैक्षणिकदृष्टया प्रगती होणे अत्यंत गरजेचे आहे. कारण सर्वार्थाने विकास हा 'शिक्षणाविना' अशक्य आहे. शैक्षणिक विकास म्हणजे एखाद्या जादुगाराने जादूची कांडी फिरवल्यावर होणारा चमत्कारिक बदल नव्हे, तर ती निरंतर प्रक्रिया असून अनेक घटकांचा-

कालावधीचा परिणाम होय.

सध्या राज्यात आदिवासी विकास आयुक्तालयामार्फत शासकीय आश्रम शाळा अनेक ठिकाणी कार्यरत आहे. त्याचा परिणाम म्हणून शाळकरी मुलांची संख्या पटावर बरीच दिसते. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी दिसते. अर्थात मला हे म्हणावयाचं नाही की, शाळांमुळे आदिवासी मुला-मुलींचे शिक्षण झाले नाही. अर्थात निश्चितच शिक्षणाचा प्रसार-प्रचार होत आहे. मात्र काही शाळेत जो अनागोंदी कारभार चालतो त्याला सर्वस्वी जबाबदार कोण आहे? याची शहानिशा करणे अत्यंत गरजेचे आहे, असे मला तरी वाटते. कारण माझ्या पाहण्यात आले आहे की, सुमारे ८०-९०% आदिवासी कर्मचारी आश्रम शाळेत कार्यरत असूनही या दीन-दुबळ्या आदिवासी मुलांकडे दुर्लक्ष केले जात आहे. ही खेदाची बाब आहे.

●●●

---

( पृष्ठ ३७ वरून पुढे )

झाली. अभूतपूर्व असे यश पाहून शहरी महिलांनी पण धडा घ्यावा आणि त्यांच्या चिकाटीचे कौतुक करावे अशी ही घटना आहे. या घटनेत एक लक्षात येईल की महिलांना करता येण्यासारखी अशी बरीच कामे आहेत की ज्यामुळे ग्रामीण भागाचा उत्तम प्रकारे विकास होऊ शकेल. फक्त एकजूट असणे हे महत्त्वाचे. 'केल्याने होत आहे आधी केलेची पाहिजे' ही उक्तीच जणू या महिलांनी सत्यात आणली आणि आपल्या प्रयत्नाने इतरांनाही चांगला मार्ग दाखवून दिला.

●●●

( पृष्ठ ४३ वरून पुढे )

मुले — १. सुमेरसिंग बटेसिंग नाईक
२. विक्रमसिंग बटेसिंग नाईक
३. नटवरसिंग बटेसिंग नाईक

मुले — १. हिराबाई बटेसिंग नाईक
२. कमलबाई बटेसिंग नाईक
३. झालाबाई बटेसिंग नाईक

८. सुमेरसिंह बटेसिंग नाईक

मुले — १. विरेंद्रसिंग सुमेरसिंग नाईक
२. चंद्रसिंग सुमेरसिंग नाईक
३. सुरेशासिंग सुमेरसिंग नाईक

९. नागर महंमद नाईक

मुले — १. गंभीरसिंग नागर नाईक
२. छत्रसिंग नागर नाईक
३. विजेसिंग नागर नाईक

१०. मन्नू महंमद नाईक

बायका — (बायका माहित नाहीत)

मुले — १. राधोसिंग मन्नू नाईक

११. राधोसिंग मन्नू नाईक

मुले — १. प्रतापसिंग राधोसिंग नाईक
२. अमरसिंग, होमसिंग, विरासिंग, गुलासिंग, भरतसिंग, धरमसिंग (इत्यादी)

अशा प्रकारे माहिती मिळते.

●●●

# आदिवासी क्रांतीकारक 'खाज्या नाईक व भीमा नाईक'

- वीरसिंग पाडवी

आपल्या मातृभूमीसाठी जेव्हा जेव्हा या देशावर संकटे आली, परकीय आक्रमणे झाली तेव्हा तेव्हा विविध कालखंडात या भूमीचा मूळ निवासी आदिवासी बांधव मागे नव्हता. प्राणाची बाजी लावून परकीय आक्रमणाविरुद्ध लढत होता. देशासाठी प्राण गमावून शहीद झाला. परंतु इतिहासकारांनी त्यांची थोडीही दखल घेतली नाही आणि जो काही थोडा फार उल्लेख सापडतो तो देखील आदिवासींना बदनाम करणारा -चोर, डाकू,लुटेरा म्हणून सापडतो. खऱ्या अर्थाने आदिवासी माणसाची अनादी काळापासून उपेक्षा करण्यात आली आहे. कारण त्याकाळी आदिवासी माणसाला माणूस म्हणून गणनाच करण्यात येत नव्हती. अनार्य राक्षस संबोधला जात होते. ते पूर्वीपासून राज्यकर्ते होते; परंतु त्यांना राजे किंवा राज्यकर्ते म्हणून मानलेच नाही. आदिवासींच्या पूर्वजाच्या हातात लेखणीच नव्हती, त्यामुळे त्यांचा इतिहास कोण लिहून घेणार ? अशा पद्धतीने आदिवासींचा स्वाभिमानी इतिहास डावलण्यात आला आहे. कारण यातून वर्ण व्यवस्थेमध्ये ब्राह्मणांनी शिकायचे व क्षत्रियांना शिकवायचे. राजा म्हणजे लढणारा क्षत्रिय. भिल्ल राजांना राजा मानले म्हणजे तो लढाऊ म्हणून क्षत्रियाच्या वर्गात मोडला जाऊ शकत होता. ब्राह्मणाच्या जवळच्या वर्गात जाऊ शकत असल्याने त्यांना राजे मानलेच नाही. अशा प्रकारे आदिवासी राज्यकर्त्यांना व त्या समाजाला अनादी काळापासून ते आजपावेतो डावलण्यात आले आहे. आदिवासींचा इतिहास उपेक्षितच आहे.

इ. स. १८७७ च्या काळात इंग्रजांच्या विरुद्ध आपल्या देशात खळबळ माजून मोठा बंड झाले. त्यात सर्वांआधी शिपायांनी बंड पुकारला होता. त्या बंडात आदिवासी माणूस देखील मागे नव्हता. खाज्या नाईक, भिमा नाईक सारखे आदिवासी वीर सामील झाले होते. खाज्या नाईक तर इंग्रज सरकारचा शिपाईच होता. इंग्रजांविरुद्ध देशात काय चालले आहे ते त्याला चांगले माहीत होते. म्हणूनच त्याने इंग्रजांच्या विरुद्ध जाऊन त्यांना सळो की पळो करुन सोडले होते. इंग्रजांनी त्याला चोर, डाकू ठरविला होता. त्याप्रमाणे इंग्रजांनी काही जमातींना गुन्हेगारी जमाती म्हणून ठरविले होते; परंतु देशाला स्वातंत्र्य मिळवून देखील खाज्या नाईक आजही डाकू म्हणून ओळखला जातो. परंतु तो डाकू का झाला याचा इतिहास तपासला गेला नाही.

खाज्या नाईक हा इंग्रजांच्या राजवटीत त्यांच्या पोलीस खात्यात नोकरीवर होता. त्याला मुंबई आग्रा रस्त्यावर मध्यप्रदेशातील सेंधवापासून तर महाराष्ट्रातील शिरपूर पावेतोच्या ४० मैलांच्या परिसरातील बंदोबस्ताची कामगिरी सोपविण्यात आली होती. आणि अशावेळी एका रस्तालुटीच्या गुन्ह्याच्या तपासणीच्या कामगिरीवर गुन्हेगारी तपासणी करताना एकजण दगावला व खाज्या नाईकावर केस दाखल होऊन त्याला १० वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. परंतु जेलमध्ये देखील त्याची वागणूक चांगली असल्याने त्याला ५ वर्षांची सूट मिळाली आणि तो पुन्हा बाहेर आला. त्याने इंग्रजांकडे पुन्हा कामावर घेण्याबाबत विनंती केली; परंतु त्याला कामावर घेतले गेले नाही. तो काळ होता इ.स. १८५७ चा. त्या काळी इंग्रज सरकारविरुध्द जिकडे तिकडे बंड सुरु झाले होते. अशावेळी इंग्रज सरकारने खाज्या नाईकला पुन्हा कामावर बोलाविले; परंतु काही दिवसातच लहान-सहान चुकांवर अपमान कारक शब्द त्याला ऐकावे लागत असे. वरिष्ठ

अधिकारी कॅप्टन बर्चने त्याला एकदा अपशब्द बोलून अपमानित केले तेव्हा त्याची अस्मिता जागृत होऊन 'इंग्रज हा परका आहे, आपल्या भूमीवर राज्य करतो आहे, त्याला हाकलले पाहिजे' या विचाराने प्रेरित होऊन नोकरीला लाथ मारुन बाहेर पडला व इंग्रजांविरूध्द बंड पुकारले. त्यावेळेस त्याला क्रांतीकारकाच्या चळवळीतील एक क्रांतीकारक भीमा नाईक येऊन मिळाला. अशा प्रकारे एकापाठोपाठ एक असे काळु बाबा, मोवश्या नाईक, भाऊ रावल, खाज्या नाईकाचा मुलगा दोल्या नाईक असे एक टोळके तयार झाले. आणि त्यांना धार, इंदूर संस्थानातील काढून टाकलेले सैनिक रोहीले अशब मक्राणी सैन्य येऊन मिळाले. अशाप्रकारे १५०० लोकांची तुकडी निर्माण झाली. भीमा नाईकाचा क्रांतीकारकांशी संपर्क होता. बडवाणी व ग्वाल्हेर कडील लोकांशी संबंध होता. बडवाणीचे संस्थानिक त्यांना हत्यारे व दारुगोळा पुरवित असत. त्याचप्रमाणे त्यांनी दिल्लीहून इशारा मिळताच इंग्रजाविरुध्द संघर्ष सुरू करून इंग्रजांना सळो की पळो करायला सुरुवात केली.

एकदा इंग्रज सैन्य अधिकारी केनडीच्या तुकडीशी समोरासमोर सामना झाला तेव्हा भीमा नाईकाने खानदेशातील पोलीस अधिकाऱ्यांना दम भरला की, 'तुम्ही सैन्यासह आमच्यात येवून जा नाहीतर तुमची खैर नाही' म्हणून तेव्हा इंग्रज सरकारने भीमा नाईक यांना पकडून देणाऱ्यास (त्याकाळी) दोन हजार रुपये बक्षीस जाहीर केले होते; परंतु त्याचा काही एक उपयोग झाला नाही. हा संघर्ष सप्टेंबर १८५७ पासून सुरु झालेला होता. अनेक लहान मोठ्या घटना घडल्या. मुंबई आग्रा रोडवरील टेलिफोनच्या तारा तोडल्या. पूर्ण बिजासनाचा घाट सातपुडा पर्वतातील ताब्यात घेवून वाहतूक बंद केली होती. २२.११.१८५७ शिरपूर शहर लुटले. अशाप्रकारे खानदेशात भिल्लांनी इंग्रजांविरुद्ध दहशत निर्माण केली होती.

शेवटी इंग्रज अधिकारी मेजर इव्हान्स यांनी खाज्या नाईक व भीमा नाईक यांना वाटाघाटी करण्यासाठी बोलावले; परंतु मेजर इव्हान्स यांना अपयश आले. वाटाघाटी झाली नाही. इव्हान्स यांच्या सैन्यावर कडवे हल्ले करण्यात आले होते. एकदा तर कलेक्टर ज्या गावी मुक्कामी होते त्या गावाच्या जवळच्या गावी सहा मैलांवर दोन खेडी लुटून हादरा दिला होता. तर जामली चौकी व बिजासन घाट या दोन ठिकाणी वेगवेगळ्या दिवशी इंदोरकडून मुंबईकडे जाणारा इंग्रजांचा माल म्हणजे पहिल्यांदा त्यांनी सात लाखाचा खजाना बिजासनाच्या घाटातून चालला होता तो त्यांनी बैलगाडींना अडवून लुटला होता. त्याच्या बंदोबस्तीला ३०० सैनिक होते तरीही ह्या भिल्ल टोळीला अटकाव करु शकले नाहीत. दुसऱ्यांदा ६० बैलगाडीतून अफू इंदोरहून मुंबईला चालला होता, तोही त्यांनी लुटून घेतला होता. अशाप्रकारे इंग्रजांविरुद्ध ह्या भिल्ल टोळीची मोहीम सुरू होती.

मध्य प्रदेश-महाराष्ट्राच्या सीमेवर सातपुडाच्या अंबापाणी नामक ठिकाणी खाज्या नाईक व भीमा नाईक व त्याचे इतर साथीदारांनी मिळून इंग्रजांशी घनघोर युद्ध केले. त्या दिवशी सकाळी आठ वाजेपासून युद्धाला सुरुवात झाली. टेकडीवर भिल्लांची टोळी तर खाली टेकडीच्या पायथ्याशी इंग्रज सैनिकांचे कडे होते. वरुन भिल्ल क्रांतीकारक वीर कामड्यांनी लढत होते तर खालून इंग्रज आधुनिक बंदुकी सारख्या हत्याराने गोळीबार करीत होते. ही लढाई दुपारी ४ ते ५ वाजेपावेतो सुरू होती; परंतु खाज्या नाईक हाती लागला नाही. परंतु भिल्लांच्या स्त्रिया मुले मिळून ४६० माणसे हाती लागले होते, त्यांना सर्वांना पकडून धुळ्याच्या जेलमध्ये डांबण्यात आले होते व ५७ लोक पकडले गेले. त्यांना ट्रमट्रॉयल मिलोटूरी ढोल वाजवून एका लायनीत उभे करुन एकसाथ गोळीबारात मारण्यात आले. तर इंग्रजांचे दोन अधिकारी व १६ सैनिक

ह्या लढाईत ठार झाले होते आणि भिल्लांचे एकूण ६५ माणसे ठार तर १७० जखमी झाले होते. ह्या लढाईला आंबापाणीची लढाई म्हणून इतिहासात प्रसिद्धी आहे. अशा रीतीने आदिवासी भिल्ल क्रांतीवीरांची ही लढाई इंग्रजांविरुद्ध झाली होती. खाज्या नाईकचे मृत्यूचे कारण अद्याप नीट समजू शकलेले नाही. परंतु ५७ क्रांतीकारक ह्या लढाईत शहीद झाले आहेत.

त्यांचा आठवण दिवस म्हणून गेल्या आठ वर्षांपासून आंबापाणी (बाटवा) ह्या ठिकाणी ता. शिरपूर येथे साजरा करण्यात येत असून आता ह्या कार्यक्रमाला महत्त्व येऊ लागले आहे. ह्या वर्षी धुळे, नंदूरबार जिल्ह्यात क्रांतीवीर खाज्या नाईक जयंती सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. त्या निमित्ताने जी काही थोडीफार मोडकी तोडकी माहिती मिळते आहे त्यावरून लेख लिहून आदिवासी क्रांतीवीराची माहिती पुढे आणण्याचे पर्यंत करण्यात येत आहेत. ह्या विषयावर आणखीण संशोधन झाले पाहिजे असे वाटते. कारण खाज्या नाईक ह्यांना डाकू, लुटेरा म्हणून कलंकीत केले जाते. त्याला उजाळा मिळेल त्यामुळे आदिवासींचे आत्मसन्मान वाढेल.

दुसरे असे की, खाज्या नाईक यांच्या वंशावळीची माहिती मिळत नसली तो संशोधनाचा मुद्दा आहे. तरी मी स्वत: अनेक वेळा शहादा तालुक्यांतील चिखलीच्या जहागीरदार नाईक घराण्याची भेट घेतली असता श्री. चंद्रसिंह सुमेरसिंह नाईक ह्यांनी त्यांना माहित असलेल्या त्याच्या पूर्वजांची माहिती सांगितली ती खालीलप्रमाणे असून खाज्या नाईक व चिखलीचे नाईक घराण्याशी संबंध जुळतो, तो खालीलप्रमाणे:

## वंशावळ

१.गुणजी नाईक
मुले १. खाज्या गुणजी नाईक, २. भिमा गुणजी नाईक
३. दामा गुणजी नाईक (पुढील माहिती नाही)

२. दामा गुणजी नाईक
मुले १. झुंजार दामा नाईक

३. झुंजार दामा नाईक
बायका १. राजूबाई, २. वाजुबाई
मुले १. दौलत झुंजार नाईक, २. देवजी झुंजार नाईक
४. देवजी झुंजार नाईक
बायका १. रुपलीबाई (तोरेणमाळ),
२. (लोणखेडावाली) नांव माहित नाही
३. महंमद देवजी नाईक

४. दौलत झुंजार नाईक
मुले १. बीरबल दौलत नाईक (पुढील माहिती नाही)
२. शज्या दौलत नाईक (पुढील माहिती नाही)

५. महंमद देवजी नाईक
बायका १. रुपाबाई (रायसिंगपूर संस्थानिकाची बहिण)
२. लालूबाई (तोरणमाळ वाली)
मुले १. लाखा महंमद नाईक
२. नागर महंमद नाईक
३. मन्नु महंमद नाईक

६. लाखा महंमद नाईक
बायका १. लिलाबाई (रामसिंग पुरवाली)
मुलगा १. बटेसिंग लाखा नाईक

७. बटेसिंग लाखा नाईक
बायका १. गंगाबाई (काठीवाली)
२. सुरतनबाई बटेसिंग नाईक

( पृष्ठ ४० वर पहा)

पुस्तक परिचय

# नक्षली चळवळीचा बुरखा फाडणारा विळा

## 'रान पाखरांची माय'

– सुनिल कुमरे

"आता रानपाखरांची भेजारलेली माय आपल्या कुपोषित पिलांसाठी सुरक्षा शोधते आहे. काळोख भरल्या डोळ्यांना कोणत्याही दिशेचा थांग नाही. म्हणून रानभर भिरभिरणारी रानपाखरे या क्रूर कोलाहात जीवाचा आकांत करीत रानाच्या पिंज-यात अडकून पडली आहेत. तरीही ......तुला जगावेच लागेल आणि तेही सन्मानाने. ही जिद्द तिच्या उरात आहेच." अशी केविलवाणी आणि असहाय्य धडपड घेवून कवयित्री कुसुम अलाम यांनी नक्षल आणि लोकशाही प्रशासनाचा सावळागोंधळ "रान पाखरांची माय" या कविता संग्रहात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'नक्षलवादी क्रांती' मध्ये कुसुमताई म्हणते-

हे तर भरकटलेले विकृत तरुण

...............................

यांना ध्येय नसतेच आणि नसते दिशाही
दुर्दशा मात्र असणारच असते
बुद्धी गहाण ठेवणारे निर्बुद्ध टोळके
अस्तित्व विसरलेले, जीवनातून पळवाटा शोधणारे

...............................

नक्षलवादी क्रांती सब झूट आहे.....!

पोलिस आणि नक्षलवादी यांच्या क्रूर दमण चक्रात झालेल्या आदिवासींच्या होळीचा जीता जागता पहारा म्हणजे 'रान पाखरांची माय'! आदिवासी समुदायाच्या अनेक अडी-अडचणी - प्रश्न -समस्या आहेत. किंबहुना समस्या म्हणजे आदिवासी अशी समीकरणे व्यवस्थेकडून मांडली जात आहेत. स्वातंत्र्याच्या उर्जेने आदिवासी शिकून-सवरुन आपल्या हक्काविषयी बोलू आणि लिहू लागला. त्याने आपला आवाज उठविल्यास आमचे काय होईल? ह्या भीतीने व्यवस्था हादरली. आणि या समुदायाला कसे रोखता यईल असे डावपेच-कटकारस्थाने रचून आदिवासी पिढ्या बरबाद आणि देशद्रोही ठरवू पाहणारी क्रूरनीती या देशात कधी लोकशाहीच्या बुरख्यात तर कधी पोलिस यंत्रणेच्या चक्रव्यूहात, तर कधी नक्षलींच्या दहशत रुपात खेळली जात आहे. गडचिरोली जिल्ह्यातील भामरागडच्या वैभव संपन्न वनात आदिवासींच्या जीवनाची राख-रांगोळी करणारी खुंदवड माणुसकीला बेचैन करणारी आहे. 'समीकरण' कवितेत कवयित्री म्हणते-

तू विचार करच!
तुझं तारुण्य नासवायचं कार्य
वेगाने सुरू आहे
नक्षलवाद+पोलिसवाद=आदिवासींचा छळ
हे समीकरण तुला सोडवायचे आहे.

ही समीकरणे खूपच गडद आणि अंधारलेली आहेत. ती न समजल्यामुळेच आपली पिछेहाट झाली आहे. एरवी या क्षेत्रात प्रश्न-समस्यांच्या नावावर इतरांच्या तुलनेत आदिवासीच का भरडला जावा? आदिवासींच्या आरक्षण आणि मतांवर

निवडून येणा-या येथील आमदार-खासदार आणि नेत्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न का होऊ शकला नाही? नक्षलवाद्यांना ही हत्यारं सोपविण्यासाठी लागणारे हात कोणते असावे हे कोणी सुचवले? भामरागडातील आदिवासींवर अन्याय होतो आणि बाकी क्षेत्रातील आदिवासींवर होत नाही असं समजावे काय? अर्थातच नाही. त्याहीपेक्षा ग्राम आणि नागरी जीवनातील आदिवासींच्या समस्या भयाण आणि किचकटीच्या व मन हेलावणा-या आहेत. अन्याय-अत्याचार, शोषण-पिडण, पिळवणूक-लाचारी या तर पाचवीलाच पुजल्या आहेत. म्हणूनच कवयित्री 'नक्षलवादी क्रांती सब झूट आहे.' असे म्हणते. नक्षलवाद्यांच्या बंदोबस्ताचे फर्मान घेऊन निघालेली पोलिस यंत्रणा आदिवासींच्या जीवावर उठली आहे. त्याचे मर्मभेदक चित्रण पुढे पहा-

एरवी मी खूप रडणारी
पण हल्ली रडायचं सोडलं
कारण अश्रू रक्ताचेच झालेत
मनाला समजावतो देखील
या रक्ताची आग होईतो थांब
मग असे जगण्याचे मरण्याचे
सारेच संदर्भ जाळून टाकू

लोकशाहीच्या जीवनाचे माणूसपण शोषून घेणारे हे कृत्य निंदनीय आणि निषेधात्मक आहे. हे सर्व का होत आहे? हे समजून घेणे जिकरीचे आहे. कवयित्रीने आपण सर्व समजून आहोत असे म्हणण्याचे कारण नाही. व्यवस्थेचे चकवे गुंतागुंतीचे आहेत. ठाणे जिल्ह्यातील वारली-कातक-याचे "जेव्हा माणूस जागा होतो"! ही गोदावरी परुळेकरांचे जागलेल्या माणसाची कादंबरी आपण वाचली आहे. परंतु काळाच्या ओघात त्या फणा काढून पुन्हा वर आहेत. त्यामुळे आपला विकास आपणासच करावा लागणार ही खूणगाठ आदिवासींनी बांधून घ्यावी. याबाबत कुसुमताई सावध आहेत. अशी कटकारस्थाने उखडून फेकण्याचे मनसुबे रचते.

...... .आता वेदनांचे वादळ घेऊन
अस्तित्व शोधतोय मी
जंगल-जिव्हा-यासह
चव्हाट्यावर सुद्धा
मला नामशेष करण्याचे
वर्णवाद्यांचे कपटी कारस्थान
मी ओळखले आहे......!
सावध रहा! सावध रहा!
झंझावात येत आहे.....!

नक्षलवाद्यांनी दहशतीसाठी घडविलेला सुरुंग स्फोट हा पोलिसांच्या यंत्रणेला कुचकामी करणारा नसून आदिवासी पिढयांना जीवंतपणी मरणयातना देणारे स्फोट आहेत. पोलिसांनी केलेल्या नक्षल बंदोबस्त कारवाया या आदिवासींच्या स्वच्छंद जीवनावर लावलेला खडा पहारा आहे. सुरुंग स्फोटातील आदिवासी, पोलिसांचे चिडचिंध्या झालेले शव आणि एनकाउंटरमध्ये पोलिस गोळीबारात आदिवासी तरुण नक्षलांच्या छातीच्या जीर्ण झालेल्या चाळण्या पाहून आदिवासी माय-बाप, पत्नी, बहीण-भाऊ यांच्या आर्त आक्रंदणे-आकांतने, अश्रु-हुंदके, चित्कार-फुत्कार किंचाळणे-लाचारी

अशी अनेक पिढ्यांची वेदना ज्याला शब्दात बांधता येत नाही. मुक्या शब्दांची भावनिक कैफियत म्हणजे रान पाखरांची माय! त्यामुळे आपल्या 'निर्णायक युद्धाचे' कवयित्रीला भान आहे.

आमच्या आसपासचे हे संकट कोणी आणले इथे?

कुणी पेरले भय या भूमीत
आम्ही कुणाचे काय घोडे मारले......?
हा रोजचा छळ .........
आम्हाला काय रक्तपात हवा होता?
आमचा छळ करणा-यांशी
निर्णायक युद्ध व्हायलाच पाहिजे!

आत्मरक्षणासाठी टोकाची भूमिका घेता येईल का? हा कवयित्रीचा प्रश्न गंभीर आणि धरसोड वृत्तीचा आहे. आपल्या अस्तित्व आणि अस्मितेच्या शोधार्थ 'बॅडीट क्वीन'होणे म्हणजे नक्षलवाद्यासारख्या महापाशाला जवळ घेणे होय. कवयित्रीने येथे संयमी असावे. ''नक्षलवाद हा आदिवासींच्या जीवनाला लागलेला जळवा आहे'' (प्रा.डॉ. विनायक तुकाराम) यातील अर्थ आदिवासी तरुणांनी समजून घ्यावा.

ज्या प्रामाणिकपणे कुसुमताईनी नक्षलवाद्यांची दुष्परिणामे आदिवासींच्या संदर्भात टिपली -त्याची नोंद केली. आदिवासी तरुणांनी बंदुकी क्रांतीपासून दूर राहण्यासाठी साहित्याच्या माध्यमातून चेतविले, ते सरानीय आहे. केवळ लिहिण्याने भागणार नाही. नक्षलवाद ही समस्या सोडल्यास आदिवासींच्या इतरही समस्या त्याच पटीत आहेत. त्यावरही त्यांनी तेवढयाच जोरकसपणे लिहावं ते आचरणात आणावं. आदिवासी साहित्याला इतर साहित्य प्रवाहात जाणीवपूर्वक डांबण्याचा प्रयत्न होत आहे, याबद्दल आदिवासी विचारवंताची भूमिका कोणती? असा प्रश्न त्यांच्या मनोगतामधे आला. अर्थात अशा वृत्तीला वेळीच ठेचण्याचे दायित्व आपलेच नाही का? आपला आत्मशोध घेताना आदिवासी साहित्यिकांनी प्रसिद्धीसाठी संख्याबळाच्या व प्रस्थापित चळवळींना भूलुन त्यांच्या पायी लोटांगण घालू नये असा सबुरीचा सल्ला या प्रसंगी द्यावा वाटतो.

सौ. कुसुमताईनी एका गंभीर आणि संवेदनशील विषयाच्या तळाशी जाण्याचा प्रयत्न केला. हा विषयच मुळी चर्चेचा-वादाचा!. आपली प्रतिक्रिया व्यक्त करण्यास कुणीही मागे-पुढे पाहणारच! पुरस्कर्ता म्हणून मला माझी नोंद करावी लागणारच! म्हणून हा दिलासा देणारा शब्द प्रपंच! सौ. कुसुमताईचा हा दुसरा कवितासंग्रह. अनेक विषयाला म्हणण्यापेक्षा ''नक्षी चळवळीचा बुरखा फाडणारा विळा आहे'' असे म्हणणे संयुक्तीक ठरेल.

आपल्या पुढच्या प्रवासाला शुभेच्छा!

●●●

***'रान पाखरांची माय'***

*कवयित्री - सौ. कुसुम अलाम*

*प्रकाशक -*

*पृष्ठे-७६, किंमत ५०/- रूपये*

संस्था वृत्त

*वेल्हे प्रकल्पातील आरोग्य मार्गदर्शिकांची*

# मनोगते

**सं**स्थेचे प्रमुख मुटाटकर सर व त्यांचे सहकारी एके दिवशी आमच्या गावात रात्री मिटिंग घेण्यासाठी आले. मिटिंगमध्ये त्यांनी गावकऱ्यांना संस्थेची व संस्था करणार असलेल्या कामाची माहिती करुन दिली. संस्थेच्या कामासाठी आमच्या गावातील एक विवाहित स्त्री व पुरूष हवेत असं सांगितलं. गावकऱ्यांनी लगेच माझं नाव सुचवलं. मी त्यादिवशी पुण्याला गेले होते. परत आल्यावर आमच्या गावातील शिक्षिका वैशालीताईंनी मला ही सर्व हकीकत सांगितली. मला ते ऐकून खूप आनंद झाला, पण माझी शिक्षणाची अडचण होती.

मी फक्त सातवीच शिकली असल्याने मला हे काम जमेल का? असे वाटू लागले, पण संस्थेच्या लोकांनी 'एवढं शिक्षण पुरेसे आहे' असं सांगितलं. काही दिवसांनी मला प्रशिक्षणाला बोलविण्यात आलं. त्यानंतर दर महिन्याला आम्ही भेटतच राहिलो. प्रशिक्षण व ह्या प्रत्येक भेटीतून मला प्रजनन व आरोग्य या संबंधीच्या प्रत्येक विषयाची माहिती मिळत गेली. ह्या प्रकल्पामुळे लोकांशी प्रत्यक्ष बोलण्याची, स्त्रिया व मुलांच्या समस्या जाणून घेण्याची संधी मिळाली. आम्ही सुध्दा प्रत्येक विषय लक्ष देऊन ऐकायला लागलो व त्यावर अभ्यास करायला लागलो. तरूण मुला मुलींच्या समस्या, त्यांच्यातील शारीरिक व मानसिक बदल, आहाराचे महत्व, स्त्री व पुरूष पुनरूत्पादन संस्था, मासिक पाळी, गर्भधारणा, गरोदरपणातील तपासण्या व काळजी, एड्स, गुप्तरोग, आयुर्वेद इत्यादी अनेक विषयांची माहिती या अभ्यासातून व प्रशिक्षणातून मिळाली. प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली तेव्हा काही अडचणीसुध्दा आल्या. एक दिवस गावातील बायकांनी मिटींग बोलावली होती तेव्हा बायका म्हणाल्या "आम्हाला गोळ्या औषधे देणार असाल तरच मिटींगला येऊ." मी जेव्हा हे शिल्पाताईंच्या कानावर घातलं तेव्हा त्यांनी एकदिवस रात्रीच्यावेळी मिटींग घेतली व त्यांना सारं काही समजावून सांगितलं. मग मलाही काम करायला अजून सोपं झालं.

पुढे कुटुंबसर्वेक्षणाचे फॉर्म भरण्याच्या निमित्ताने आम्हाला ह्या प्रकल्पाविषयी खूप चर्चा करायला मिळाली. गावातल्या लोकांनी चांगली साथ दिली. विरोधात कोणी गेलं नाही. काही दिवसांनी आमच्या तालुक्याला भेट देण्यासाठी परदेशी पाहुणे आले होते. त्यांना आमच्या तालुक्यातील पाबे व लाशिरगांव ही दोन गावं दाखवली. आमच्या गावातही आणण्याची खूप खूप इच्छा होती, पण त्यांना उशीर झाल्यामुळे ती अपूर्णच राहिली.

आता आम्ही दुसऱ्या गावामध्ये जाऊन सुध्दा मिटींग घेवू शकतो. तिकडे गेल्यावर काही लोक हसतात व टोचून बोलतात,पण मी कोणाकडं लक्ष देत नाही. मी माझं काम करत राहते. लोकांनी काही विचारलं तर त्यांनाही बरोबर उत्तर देते. आमच्या गावच्या हायस्कूलमध्ये अभयसर मुलांची मिटींग घेतात व मुलांच्या प्रश्नांवर चर्चा करतात. ह्या प्रकल्पातून आम्हाला काही पुस्तकं देण्यात आली. बायकांची मिटींग घेताना त्यांचा आम्हाला खूप उपयोग होतो. कधी कधी गावातल्या बायका रात्रीच्या आमच्या घरी गप्पा मारायला येतात. या गप्पांमधून

बायकांचे काही गैरसमज असतील तर ते दूर करण्याचं काम मी करते.

ह्या गप्पांमध्ये एड्स रोगाविषयी, संबंधांविषयी, गर्भ कसा राहतो इत्यादी विषयांवर चर्चा होते. माझ्याकडची पुस्तकं गावातील तरूण मुलं मुली वाचायला नेतात. ह्या प्रकल्पामुळे माझ्या स्वतःच्या बुध्दीत अतिशय बदल झाला. मला हे काम करताना खूप बरं वाटलं. संस्थेची लोक शिल्पाताई व अभयसर ह्यांचा स्वभाव मला खूप आवडतो. मी माझ्या गावकऱ्यांचे आभार मानते की, त्यांनी माझं नाव ह्या प्रकल्पासाठी सुचवलं. त्यांच्यामुळेच मला हे काम करण्याची संधी मिळाली. एवढ्या चांगल्या लोकांशी माझी ओळख झाली.

**- श्रीमती उमा ढवळे**
**आरोग्य मार्गदर्शिका, दापोडे,**
**ता. वेल्हे, जि. पुणे**

---

**नो**व्हेंबरपासून आमच्या गावात ह्या प्रकल्पाची सुरुवात झाली. संस्थेच्या या कामासाठी माझं नाव आमच्या गावातील बाळू धरपाळे ह्यांनी सुचवलं. सावंत, अभयदादा, आगाशे यांच्याकडून सुरुवातीला प्रशिक्षणातून मला सर्व विषयांची माहिती मिळाली. शिल्पाताई दर महिन्याला आमच्या गावात येऊ लागल्या. त्यांनी सुरुवातीला दोन तीन वेळा आमच्या गावात मिटींगा घेतल्या; पण बायका जमत नव्हत्या. मग मी घरोघरी जाऊन त्यांना बोलावून आणू लागले. थोड्याफार बायका जमू लागल्या. शिल्पाताई त्यांना काही चित्रे दाखवू लागल्या. ती चित्रे पाहून बायका लाजायच्या. ताईंनी बायकांना सांगितले ''लाजू नका ही माहिती आपल्या आरोग्याची आहे. तुमच्या मुलीचीसुद्धा आहे''.

मध्यंतरी दोन महिने मी गावातील राजकीय वादामुळे मिटींगला आले नाही; परंतु शिल्पाताईंनी फोन करून विचारले तेव्हा मात्र मी 'मला हे काम करण्याची इच्छा आहे', असे सांगितले आणि मी परत मिटींगला येऊ लागले. पुढे मी आपल्या गावात येणाऱ्या सिस्टरीणबाईच्या मदतीने मिटींगा घेऊ लागले. याकामात मला आमच्या बालवाडीताईंनी मदत केली. सिस्टरीणबाईंनी माझ्याकडे काही औषधे दिली होती, ती मी गावातल्या बायकांना देऊ लागले. त्यामुळे माझ्या कामाची बायकांना ओळख झाली. नंतर मी बालवाडीताईंच्या मदतीने बायकांच्या मिटींगा घेऊ लागले व त्यांना आरोग्याची, स्वच्छतेची माहिती पटवून देऊ लागले. एक दिवस गावातील एक महिला माझ्याकडे आली व सात वर्षे होऊनही मूल नाही असे तिने मला सांगितले. मी तिला सर्व माहिती विचारली तेव्हा असे कळले की ती एकटीच दवाखान्यात जायची. तिचे पती शहरात कामाला असल्यामुळे ते तिच्याबरोबर नसायचे. मी तिला 'दोघांनीही दवाखान्यात जा व तपासणी करून घ्या' असे सुचविले तेव्हा त्या दोघांनी दोन तीन महिने पुण्याला उपचार घेतले. आता ती बाई गरोदर आहे. माझा सल्ला तिच्या उपयोगी पडल्यामुळे तिला आनंद झाला.

मी जसजशी बायकांशी बोलते, मुला-मुलींच्या समस्या जाणून घेते तसतशा मला गावातल्या समस्यांची जाणीव व्हायला लागली आहे. मी माझ्या मनाचा निर्धार केला आहे की, आता आपण स्त्रियांना बोलते केलं पाहिजे. या कामात मला माझे पती व सासू-सासऱ्यांचे खूप सहकार्य मिळत आहे.

**- सौ. शोभा गायकवाड**
**आरोग्य मार्गदर्शिका, वांजळे,**
**ता. वेल्हे, जि. पुणे**

# हाकारा अंक-सूची


१) जानेवारी - मार्च १९८० : जबरन जोत जंगल जमीन
२) एप्रिल - जून १९८० : आदिवासी व शिक्षण
३) जुलै - सप्टेंबर १९८० : आदिवासी व वनसंवर्धन
४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८० : आदिवासी व साहित्य कला
५) जानेवारी - मार्च १९८१ : दलितांना सवलती व राखीव जागा
६) एप्रिल - जून १९८१ : आदिवासी व आरोग्य
७) जुलै - सप्टेंबर १९८१ : वनशेती व संवर्धन
८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८१ : रोजगार हमी योजना
९) जानेवारी - मार्च १९८२ : उत्तराखंड अभ्यास मोहीम
१०) एप्रिल - जून १९८२ : धरणे व विकास
११-१२) जुलै - डिसेंबर १९८२ : जंगल व्यवस्थापन
१३) जानेवारी - मार्च १९८३ : आदिवासी व दारू
१४) एप्रिल-जून १९८३ : आदिवासींच्या सामाजिक/राजकीय चळवळी
१५) जुलै - सप्टेंबर १९८३ : प्रा. सरदार गौरव अंक/आदिवासी साहित्य
१६) ऑक्टोबर-डिसेंबर १९८३ : आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
१७-१८) जानेवारी - जून १९८४ : आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
१९) जुलै - सप्टेंबर १९८४ : आदिवासी स्त्री
२०) ऑक्टोबर - डिसेंबर १९८४ : आदिवासी आरोग्य व शिक्षण
२१) जानेवारी - मार्च १९८५ : आदिवासी संघटन
२२) एप्रिल - जून १९८५ : जमीन हस्तांतर
२३) जुलै - सप्टेंबर १९८५ : आदिवासी महिला
२४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८५ : आदिवासी व सरकार
२५) जानेवारी - मार्च १९८६ : जंगल व धरण
२६) एप्रिल - जून १९८६ : आदिवासी कला
२७) जुलै - सप्टेंबर १९८६ : आदिवासी व वेठबिगारी
२८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८६ : आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
२९) जानेवारी - मार्च १९८७ : भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
३०) एप्रिल - जून १९८७ : आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३१-३२) जुलै - डिसेंबर १९८७ : राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
३३) जानेवारी - मार्च १९८८ : सवलती अपहरणाची समस्या
३४) एप्रिल - जून १९८८ : आदिवासी साहित्य
३५ - ३६) जुलै - डिसेंबर १९८८ : आदिवासी समाज व संस्कृती
३७ - ३८) जानेवारी - जून १९८९ : डॉ. बेरीअर एलबीन विशेषांक
३९ - ४०) जुलै - डिसेंबर १९८९ : व्यवसाय मार्गदर्शन
४१-४२) जानेवारी - जून १९९० : महाराष्ट्रतील आदिवासींची परिस्थिती
४३) जुलै - सप्टेंबर १९९० : जागतिक आदिवासी
४४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९० : गं. बा. सरदार स्मृती विशेषांक
४५-४६) जानेवारी - जून १९९१ : आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
४७) जुलै - सप्टेंबर १९९१ : आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
४८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९१ : आदिवासी जीवन व संस्कृती
४९-५०) जानेवारी - जून १९९२ : सर्वसाधारण आदिवासी
५१ - ५२) जुलै - डिसेंबर १९९२ : अनुताई वाघ विशेषांक
५३ - ५४) जानेवारी - जून १९९३ : आदिवासी धर्म, सण व उत्सव
५५-५६) जुलै - डिसेंबर १९९३ : धरण-विस्थापन व पुनर्वसन
५७) जानेवारी - मार्च १९९४ : सर्वसाधारण आदिवासी
५८) एप्रिल - जून १९९४ : आदिवासी एकता परिषद
५९) जुलै -सप्टेंबर १९९४ : आदिवासी विकासाची सैद्धान्तिक भू मेका
६०) ऑक्टोबर - डिसेंबर १९९४ : आदिवासी जमाती
६१-६२) जानेवारी - जून १९९५ : राणीपूर अभ्यास विशेषांक
६३) जुलै - सप्टेंबर १९९५ : कुपोषण विशेषांक
६४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९५ : पर्यावरण विशेषांक
६५) जानेवारी - मार्च १९९६ : आदिवासी जमाती
६६) एप्रिल - जून १९९६ : महाराष्ट्र, ओरिसा अभ्यास दौरा
६७) जुलै - सप्टेंबर १९९६ : आदिवासी जमाती
६८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९६ : आदिवासी शिक्षण
६९ - ७०) जानेवारी - जून १९९७ : वारली लोकगीते व बोलीभाषा
७१) जुलै - सप्टेंबर १९९७ : पंचायत राज विशेषांव
७२) ऑक्टोबर - डिसेंबर १९९७ : साहित्य संमेलन विशेषांक
७३) जानेवारी - मार्च १९९८ : वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
७४) एप्रिल - जून १९९८ : सर्वसाधारण आदिवासी
७५ - ७६) जुलै - डिसेंबर १९९८ : आदिवासी समाज व संस्कृती
७७) जानेवारी - मार्च १९९९ : आदिवासी व आर्थिक धोरण
७८) एप्रिल - जून १९९९ : आदिवासी विकास व संस्कृती
७९ - ८०) जुलै - डिसेंबर १९९९ : बोर्डी परिसर अभ्यास
८१) जानेवारी - मार्च २००० : आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
८२) एप्रिल - जून २००० : स्त्रिया आणि आरोग्य
८३) जुलै - सप्टेंबर २००० : पाणी टंचाई आणि पाणलोट विकास

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन व प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त रूप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल.)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नांवे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**व्यवहाराचा पत्ता**

रा. के. मुटाटकर, अध्यक्ष
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा

ज्ञानप्रबोधिनी मुद्रण विभाग, पुणे ३०